RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
३ शुक्रवार
एप्रिल २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक ३०७
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## राज्यातील १ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान



**▸विदर्भ केसरी।मुंबई :**

राज्यातल्या काही भागात झालेल्या अवकाळी पावासाचा आणि गारपिटीचा शेतक-यांना मोठा फटका बसला आहे. अवकाळी पावसामुळे १ लाख २२ हजारांहून अधिक हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, कांदा, संत्रा, द्राक्ष तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले.

मार्च महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यभर मोठे नुकसान झाले आहे. विशेषत: नाशिक (२९ हजार ८१२ हेक्टर), अहिल्यानगर (२३ हजार ६३३ हेक्टर), जळगाव (२२ हजार ३६१ हेक्टर), धुळे (१४ हजार ८३२ हेक्टर), बुलढाणा (८ हजार ५०७ हेक्टर) व छत्रपती संभाजीनगर (८ हजार ४४५ हेक्टर) आदी जिल्ह्यांतील लाखो हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत.

शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी कांदा कुजला असून पपईची रोपेही खराब झाली आहेत. शेतात पाणी साचल्याने उभी पिके आडवी झाली असून मजुरी व खतांचा खर्च वाया गेला आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे आणि शेतक-यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या दौ-यादरम्यान त्यांनी गावातील नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. अनेक ठिकाणी फळगळ, झाडांचे नुकसान तसेच उभ्या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिका-यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करून बाधित शेतक-यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल, असे आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

## रसायनांच्या दरात १५ ते ५० टक्के वाढ

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

सध्या शेतक-यांवर चहूबाजूंनी संकट उभे ठाकले आहे. ‘एल निनो’मुळे वेळेत आणि पुरेसा पाऊस पडेल का? खरीप हंगामातील पेरण्या वेळेत झाल्या तर खतांच्या वाढत्या किमती यामुळे बळिराजा चिंतेत आहे. आखाती युद्धामुळे जागतिक पातळीवर रासायनिक खतांची पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याचा परिणाम जाणवत आहे. खते तयार करण्यासाठी लागणा-या विविध रसायनांच्या किमती १५ ते ५० टक्क्यांनी वाढल्या आहेत. आगामी खरीप हंगामावर खत टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक बंद असल्यामुळे युक्रेन, रशिया, बेलारूस, कॅनडा आदी देशांतून होणारा रासायनिक खतांचा आणि खतांसाठी लागणा-या कच्च्या मालाचा पुरवठा बंद आहे. परिणामी सद्यस्थितीत युरियाची टंचाई जाणवत आहे. अन्य संयुक्त आणि मिश्र खतांची सध्या टंचाई नसली तरीही युद्ध लांबल्यास अन्य खतांची टंचाई आणि दरवाढ अटळ आहे. नत्रयुक्त खते तयार करण्यासाठी अमोनिया, नैसर्गिक वायू व नॅफ्थाची आवश्यकता असून, भारत हे घटक सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिराती व ओमानमधून आयात करतो. स्फुरदयुक्त खतांसाठी रॉक फॉस्फेट, फॉस्फोरिक ॲसिड, गंधकाची गरज असून, ही रसायने मोरोक्को, जॉर्डन, सेनेगल, ट्युनिशिया, सौदी अरेबिया, यूएईमधून तर पालाशयुक्त खतांसाठी म्युरेट ऑफ पोटॅशची आवश्यकता असल्याने ते कॅनडा, रशिया, बेलारूस, इस्रायल व जॉर्डनमधून आयात केले जाते. या रसायनांच्या वाहतुकीचा मार्ग होर्मुझ खाडी असून, युद्धामुळे ही खाडी पूर्णपणे बंद आहे.

# 71 लाख लाडक्या बहिणी अपात्र

## ई-केवायसीसाठी 30 एप्रिलपर्यंत संधी! 1 कोटी 75 लाख महिलांना मिळणार लाभ

**▸विदर्भ केसरी।**

**राज्य सरकारची ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना आता मोठ्या वादाच्या भोऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेल्या या योजनेत तब्बल 71 लाख महिला अपात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या अपात्र महिलांच्या खात्यावर गेल्या 20 महिन्यांत सरकारने सुमारे 21 हजार 300 कोटी रुपये जमा केले आहेत.**




2024 पासून लाडकी बहीण योजना सुरू असून महिलांच्या खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा होत आहेत. सुरुवातीला तब्बल 2 कोटी 62 लाख अर्ज दाखल झाले होते. मात्र, छाननीमध्ये अनेक त्रुटी समोर आल्या. चारचाकी वाहन असणे, कुटुंबातील सदस्य सरकारी सेवेत असणे किंवा तांत्रिक कारणांमुळे जवळपास 10 लाख महिला आधीच अपात्र ठरल्या होत्या. योजनेत अनेक अपात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खातरजमा करण्यासाठी राज्य सरकारने ई-केवायसी बंधनकारक केली होती.

महिला व बालविकास विभागाने केलेल्या या पडताळणीमुळे आता सरकारचे दरमहा होणारे 1065 कोटी रुपयांचे नुकसान टळणार आहे. एप्रिल 2026 पासून या अपात्र महिलांना मिळणारे 1500 रुपये बंद केले जाणार आहेत. मात्र, गेल्या 20 महिन्यांपासून जे मानधन दिले गेले, त्या अवाढव्य खर्चाची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न आता विरोधकांकडून विचारला जाण्याची शक्यता आहे.

### 30 एप्रिलपर्यंत करा KYC

- **दरम्यान, ई-केवायसी करताना अनेक लाभार्थींना अनेक तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागल्याने तसेच राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्ती आणि इतर अडचणींमुळे या योजनेतील अनेक पात्र लाभार्थींना ई-केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नव्हती. त्यामुळे 31 डिसेंबरपर्यंत मुदतवाढ करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही अनेक महिलांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला होता. विशेषतः कुटुंबातील सरकारी नोकरीबाबत चुकीचा पर्याय निवडला गेल्याने अनेक बहिणींचे 1500 रुपये बंद झाले होते. या तक्रारींची आणि ज्या महिलांची ई-केवायसी प्रलंबित राहिली होती, त्याची दखल घेत सरकारने पून्हा 30 एप्रिल 2026 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ज्या महिला आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत, त्यांच्या खात्यात मे महिन्यापासूनचे पुढील हप्ते जमा केले जाणार नाहीत. तसेच, त्यांचे नाव तात्पुरते निलंबित होऊ शकते. या योजनेत अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या आणि सरकारी नोकरीत असूनही लाभ घेणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढल्याचे सरकारच्या निदर्शनास आले होते. ‘अर्ज भरा आणि लाभ मिळवा’ या धोरणामुळे लाभार्थ्यांचा आकडा 2 कोटी 47 लाखांवर गेला होता. मात्र, आता ई-केवायसी आणि डेटा शुद्धीकरण मोहिमेत यातील 71 लाख महिला निकषात बसत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.**

# एक मुखाने बोला, बोला जय जय हनुमान...'

**▸विदर्भ केसरी। नागपूर,**


हनुमान जन्मोत्सवानिमित्त हनुमाननगर, मेडीकल चौकातील राजाबाक्षा हनुमान मंदिरातून गुरुवारी सायंकाळी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमानंतर मुख्य अतिथी पोलीस उपायुक्त रश्मिता राव यांच्या हस्ते महाआरतीनंतर झाल्यानंतर शोभायात्रेला सुरुवात झाली. याप्रसंगी शोभायात्रेचे मुख्य संयोजक ॲड. विवेक तिवारी, वेदांत तिवारी, विश्वनाथ विघ्नेश बिलसे यांनी शोभायात्रेचे संचालन केले.

यंदाच्या शोभायात्रेत यंदा ७० हून अधिक आकर्षक चित्ररथ सहभागी झाले होते. धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक संदेश देणाऱ्या विविध देखाव्यांचा समावेश शोभायात्रेत होता. हनुमान चालीसा पाठ करीत असलेले चित्ररथ भाविकांचे आकर्षणाचे केंद्र होते. श्री राजाबाक्षा हनुमान मंदिरातून निघालेली ही रामबाग कॉलनी, मेडीकल चौक येथून निघाल्यानंतर विविध ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.अनेक ठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. मुख्य मार्गावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

मेडीकल चौकातून ही ही शोभायात्रा पुढे मार्गक्रमण करीत उंटखाना चंदननगर - क्रीडा चौक, वकील पेठ, सिरसपेठ चौक, रेशीमबाग चौक, डॉ. हेडगेवार स्मृती मंदिर, जुनी रोड, गजानन चौक रेशिमबाग, गुरुदेवनगर चौक, तिरंगा चौक, शिवनगर, सक्करदरा चौक, आयुर्वेदिक लेआऊट, सोमवारी क्वॉर्टर्स, छोटा ताजबाग चौक रघुजी नगर, दत्तात्रेयनगर, अयोध्या नगर, सुभेदार लेआऊट, मानेवाडा सिमेंट रोड, तुकडोजीनगर, चंद्रमणी नगर, विश्वकर्मा नगर, अजनी पोलिस स्टेशन चौक, वंजारी नगर, अजनी रेल्वे कॉलनी, टीव्ही वॉर्ड चौक, राजाबाक्षा हनुमान मंदिर येथे समारोप झाला.

### हनुमान चालीसाचे अखंड पठण

- **भजन-कीर्तन-सुंदरकांड, शोभायात्रा, कलश यात्रा, पूजन विधी, महायज्ञ, महाआरती आणि महाप्रसादाचेही आयोजन मंदिर प्रशासन व सामाजिक संस्थांच्या वतीने करण्यात आले होते. श्री हनुमान जन्मोत्सव शोभायात्रेत संपूर्ण मार्गावर सामूहिक पठणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. दिवसभर हनुमान चालीसाचे अखंड पठण तसेच महाआरतीत मोठया संख्येने भाविक सहभागी झाले होते.**



दैंनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

**पात्रता आणि आवश्यकता:**

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

- **शिक्षण:** कोणत्याही शाखेचा पदवीधर
- **आकर्षक मानधन:** पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
- एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९



## दोन घरे खाक, वृद्ध महिलेचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। धारणी,**

चिखलदरा तालुक्यातील आकी गावात बुधवारी रात्री अचानक लागलेल्या भीषण आगीत दोन घरे पूर्णतः जळून खाक झाली असून या दुर्घटनेत एका वृद्ध महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. मनकाय गनसा बेलसरे (वय ८५) असे मृतक महिलेचे नाव आहे. घटनेच्यावेळी वृद्ध महिला घरात एकटीच होती. या महिलेला दृष्टी नव्हती. तिचा नातू घरात दिवा लावून गावात मित्रांसोबत बसला होता. दरम्यान बेलसरे यांच्या घराला अचानक आग लागली.

आगीने क्षणार्धात रौद्ररूप धारण करत शेजारील दुसऱ्या घरालाही वेढा दिला. घटनेनंतर गावकऱ्यांनी तत्परता दाखवत घराघरातून पाणी आणून आग विझवण्याचा प्रयत्न केला. सरपंचांनी स्वतःचा टँकर आणून मदत केली.

गावकऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे काही वेळात आग आटोक्यात आणण्यात यश आले. दरम्यान, अचलपूर येथून अग्निशामक दलाची गाडीही घटनास्थळी दाखल झाली व त्यांनी आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाले आणि वृद्ध महिला जळून खाक झाली.

तुळशीराम गनसा बेलसरे व अजय बाबू धांडेकर यांचे घरे जळून खाक झाली. ग्रामसेवकांनी घटनेची नोंद घेतली आहे. घरकुल योजनेतून नवीन घर मंजूर करावे, अशी मागणी दोन्ही कुटुंबांनी केली आहे.



दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ | २

# लाच घेताना महावितरणचे अधिकारी जाळ्यात

**विदर्भ केसरी।**

कर्तव्यावर असताना घडलेल्या अपघातात कर्मचाऱ्याचा हात कापावा लागला. त्या कर्मचाèयांवर झालेल्या उपचाराचे वैद्यकीय बिल आणि सेवा लाभ परतावा (अरियर्स) मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात अडीच लाखांची लाच स्विकारताना महावितरणच्या उपव्यवस्थापक व कनिष्ठ लिपीकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली.

उप व्यवस्थापक गणेश नथुजी डोरले ( 51) आणि मानव संसाधन विभागाचे सुमित रेवतकर अशी लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे आहेत. महावितरण कर्मचाऱ्याने केलेल्या तक्रारीच्या आधारावर एसीबीच्या पथकाने हिंगणा येथे सापळा रचून गुरुवारी दुपारी ही कारवाई केली. तक्रारदार हे महावितरणच्या हिंगणा कार्यालयात वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत.



कर्तव्यावर असताना झालेल्या एका अपघातात त्यांचा उजवा हात कापला गेला होता. त्याचे मेडिकल बिल प्रलंबित होते. त्यांना मिळालेल्या सेवा लाभ परताव्याची (अरियर्स) ची रक्कमही थकली होती. या बदल्यात लाचखोर गणेश डोरले आणि सुमित रेवतकर या दोघांनी अडीच लाख रुपये मागितले. ठरल्या प्रमाणे तक्रारदाराने उप व्यवस्थापक गणेश डोरले या दोघांना घरी बोलावले. लाचेची रक्कम घेण्यासाठी दोघेही तक्रारदाराच्या घरी पोहोचले. बैठकीत अडीच लाखांची रक्कम स्विकारताच दुसऱ्या खोलीत बसलेल्या पथकाने छापा टाकला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक डॉ. दिगंबर प्रधान, अपर पोलिस अधीक्षक माधुरी बाविस्कर, विजय माहुलकर ,पोलिस निरीक्षक मयूर चौरसिया, हवालदार भरत ठाकूर यांनी ही कारवाई केली.

### हात कापावा लागला तरीही लाच मागितली

**महावितरणच्या कर्मचाऱ्याचा कर्तव्य पार पाडत असताना अपघात झाला. त्यामध्ये त्यांचा हात कापावा लागला. घरात एकमेव कमावता व्यक्ती अपघातात अपंग झाल्यामुळे कुटुंबावर मोठे संकट होते. अशा संकटात महावितरणचे कर्मचारी आणि अधिकारी कुटुंबाच्या पाठीशी उभे राहतील अशी त्यांना आशा होती. मात्र, आर्थिक संकटात सापडलेल्या अपंग कर्मचाèयाला आर्थिक मदत तर नव्हे त्यालाच अडीच लाख रुपयांची लाच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाèयाने मागितल्यामुळे विभागाची प्रतिमा डागाळली आहे. या अडीच लाखांतील काही रक्कम आणखी कुण्या अधिकाèयाला किंवा कर्मचाèयापर्यंत पोहचणार होती का, याचा तपासही एसीबी करीत आहेत.**

# कत्तलीसाठी नेत असलेल्या २८ गोवंशाची सुटका

**विदर्भ केसरी।**

शहरातील रहीम नगर परिसरात कत्तलीसाठी गोवंश जनावरे अवैधरित्या कोंडून ठेवण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी वेळीच धडक कारवाई करत तब्बल २८ गोवंशांची सुटका करून सुमारे ४ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले आहे.



अब्दुल अजीम कुरेशी वय 34 रा . अरब कॉलनी, उमरखेड असे आरोपीचे नाव असून त्यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे .

दि. १ एप्रिल रोजी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, रहीम नगर परिसरात एका शेडमध्ये मोठ्या प्रमाणात गोवंश जनावरे कोंडून ठेवण्यात आली असून त्यांना कोणतीही चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीसाठी तेलंगणा येथे पाठविण्याची तयारी सुरू आहे. या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव यावेळी शेडच्या आत व बाहेर एकूण २८ गोवंश जनावरे अत्यंत दाटीवाटीने, हालचाल करण्यास जागा नसलेल्या अवस्थेत व अल्प दोरीने बांधून ठेवलेली आढळली. अनेक जनावरे उपाशी अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. सदर सर्व जनावरांची एकूण किंमत अंदाजे ४,४२,००० रुपये असून कोणत्याही जनावरावर ओळख पटविण्यासाठी टॅग नव्हता. यावरून ही जनावरे अवैधरित्या साठवून कत्तलीसाठी वाहतूक करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी पंचनामा करून सर्व जनावरे जप्त केली असून त्यांची वैद्यकीय तपासणी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून करून घेण्यात आली. तसेच या जनावरांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना विठ्ठळ येथील कामधेनू गौशाळेत हलविण्यात आले आहे. या प्रकरणी अब्दुल अजीम कुरेशी उमरखेड याच्याविरुद्ध प्राण्यांवर क्रूरतेचा प्रतिबंध अधिनियम १९६० तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बोपीनावार यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार संदीप ठाकूर करत आहेत.

# विद्यार्थिनीचे अपहरण आणि बलात्कार

**विदर्भ केसरी। नागपूर,**

आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिचे अपहरण केले. तिला हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आला. या प्रकरणी सदर पोलिसांनी गुन्हा दाखल करून गिट्टीखदान येथील आरोपी करण केशव केसी (28) याला अटक केली.

पीडित 13 वर्षीय मुलगी रिया (बदललेले नाव) हिची आरोपी करणशी इन्स्टाग्रामवर ओळख झाली. तेथून त्यांची मैत्री झाली. करणने मुलीला फसवून प्रभावित करण्यास सुरुवात केली. करणच्या वडिलांचे किराणा दुकान असून तो टाईल्स फिटींगची कामे करतो. त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. दोघांचे प्रेमसंबंध सुरु झाले. 18 मार्च रोजी दोघांनी हॉटेलमध्ये जाण्याचे ठरविले. तो मुलीच्या शाळेजवळ आला. ठरल्याप्रमाणे, सकाळी 7 वाजता करणने मुलीला शाळेसमोरून आपल्या दुचाकीवर घेऊन गेला.

तिला स्वच्छतागृहात नेले. तिथे मुलीने शाळेचा गणवेश बदलला. त्यानंतर करण मुलीला फ्रेंड्स कॉलनीतील एका हॉटेलमध्ये घेऊन गेला. करणकडे एका तरुणीचे आधार कार्ड दाखवून तेथे खोली बूक केली. त्याने तिच्यासोबत लैंगिक संबंध ठेवले आणि अनैसर्गिक कृत्ये केले. त्यानंतर तो 27 मार्च रोजी मुलीच्या शाळेत परत गेला. पूर्वीप्रमाणेच, तो तिला दुचाकीवरून शाळेतून तिचा गणवेश बदलल्यानंतर एका हॉटेलमध्ये घेऊन गेला आणि तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. ती वारंवार करणसोबत फिरायला जात होती.

# दुचाकी चोरीप्रकरणी दोन अल्पवयीन मुले ताब्यात

**विदर्भ केसरी। नांदेड :**

शहरातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांचा तपास करत असताना वजिराबाद पोलिसांच्या हाती एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्या गुन्ह्यांचा पोलिस शोध घेत होते, ते गुन्हे कोणा सराईत गुन्हेगाराने नव्हे, तर काही अल्पवयीन मुलांनी केल्याचे उघड झाले आहे. कारवाईत पोलिसांनी चार लाख रुपये किमतीचे तब्बल 17 दुचाकी जप्त केल्या असून, कोवळ्या वयातील मुलांचा गुन्हेगारीतील सहभाग विचार करायला लावणारा आहे.

काही दिवसांपूर्वी चिखलवाडी कॉर्नर येथून मोहम्मद जुनेद कुरेशी यांची पल्सर चोरीला गेली होती. या तक्रारीवरून वजिराबाद पोलिसांनी तपास सुरू केला असता हिंगोली गेट परिसरात दोन मुले संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून या मुलांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान जेव्हा सत्य समोर आले, तेव्हा पोलिसही अवाक् झाले. ही मुले अल्पवयीन असल्याने पोलिसांनी तात्काळ त्यांच्या पालकांना पाचारण केले. पालकांच्या उपस्थितीत झालेल्या चौकशीत या मुलांनी एकामागून एक तब्बल 17 दुचाकी चोरल्याची कबुली दिली.

# महसूल विभागात ३५ हजारांहून अधिक पदांना मंजुरी

**विदर्भ केसरी। मुंबई,**

राज्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम, जलद आणि लोकाभिमुख करण्यासाठी शासनाने मोठा निर्णय घेत महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर केला आहे. तब्बल वीस वर्षांनंतर करण्यात आलेल्या या बदलामुळे विभागाच्या रचनेत व्यापक फेरबदल होणार आहेत.

या नव्या आराखड्यानुसार एकूण ३५ हजार ८७६ पदांना मंजुरी देण्यात आली असून, मुद्रांक, भूमी अभिलेख आणि महसूल या तिन्ही विभागांचा समावेश करण्यात आला आहे.



गेल्या दोन दशकांत वाढलेल्या कामाच्या व्यापामुळे आणि बदलत्या गरजांमुळे हा निर्णय घेण्यात आला. यापूर्वीचा आकृतीबंध २००६ मध्ये निश्चित करण्यात आला होता. नव्या आराखड्याला उच्चस्तरीय समितीने मान्यता दिल्यानंतर शासनाने अधिकृत निर्णय जाहीर केला आहे.

या सुधारित रचनेत विभागीय, जिल्हा आणि तालुका स्तरावर कार्यालयांची संख्या वाढवण्यात आली आहे. राज्यभरात ६ विभागीय आयुक्तालये, ३६ जिल्हाधिकारी कार्यालये, १९२ उपविभागीय कार्यालये आणि ३६० तहसील कार्यालये असतील. याशिवाय, २,६२५ मंडळ कार्यालये आणि १५,७४७ तलाठी पदांची निर्मिती करण्यात आली आहे. नागरिकांना अधिक सोयीसाठी ११ नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालये, ८ उपविभागीय कार्यालये आणि इतर प्रशासकीय पदांनाही मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे नागरिकांना त्यांच्या कामांसाठी दूरवर जाण्याची गरज कमी होणार असून, महसूल विभागाचे काम अधिक वेगवान आणि पारदर्शक होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## अग्रलेख

# जायबंदी!

फेब्रुवारी ते जूनदरम्यान मुंबईच्या फळ मार्केटमध्ये हापूस आंब्याच्या विक्रीला मोठी गती मिळत असून गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर कोट्यवधींची उलाढाल झाली. रत्नागिरी व देवगड हापूसची आवक अवकाळी पाऊस आणि कीड हल्ल्यांमुळे घटली असून त्यामुळे दर गगनाला भिडले आहेत. आखाती युद्धामुळे निर्यात ठप्प झाल्याने यंदा स्थानिक बाजारात हापूस आंबा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाला आहे. फेब्रुवारी ते जून या पाच महिन्यांच्या कालावधीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ मार्केटमधील उलाढालीला कमालीची गती मिळालेली असते. फळ मार्केटमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच परराज्यातूनही फळे विक्रीला येत असतात. या मार्केटमध्ये देशाच्या अनेक राज्यांतून आंबे विक्रीला येत असले तरी कोकणचा हापूस हा आंबा खवय्यांच्या पसंतीचा असतो. वर्षभर वाट पाहिलं, पण खाल्ला तर हापूसच खाईन, असे आंबाप्रेमी अभिमानाने सांगत असतात. गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, राम नवमी व अन्य सणांना घराघरांमध्ये हापूस आंब्याच्या रसाचा कार्यक्रम ठरलेलाच असतो. त्यामुळे अन्य दिवसांच्या तुलनेत या दिवसांसाठी आंबा विक्रीच्या उलाढालीचा आलेख कमालीचा उंचावलेला असतो. कोकणच्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा तीन जिल्ह्यांतून मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल येथील नागरिकांसाठी आंबा विक्रीला येत असला तरी रायगडच्या तुलनेत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूसला अधिक मागणी असते व चवीचा दर्जाही काही वेगळाच असतो. भाज्या आणि फळभाज्या मार्केटमध्ये विक्रीला शेतकऱ्यांकडून थेट येत असतात. हापूस आंब्याचे गणित त्या तुलनेत वेगळे असते. मार्केटमध्ये आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंबा थेट विक्रीला पाठविण्याचे प्रमाण नगण्य असते. मार्केटमधील व्यापारीच कोकणात जाऊन थेट बागांचाच सौदा करत असल्याने फळांचे पैसे शेतकऱ्याला जागेवरच उपलब्ध होत असतात. गुढीपाडव्याच्या दिनी मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल आंबा विक्रीतून झालेली आहे. खवय्यांची आंब्याला असलेली पसंती पाहून अन्य राज्यातील आंबा उत्पादक महाराष्ट्रातील शहरी भागातील मार्केटमध्ये आंबा विक्रीला पाठवत असतात. कोकणच्या हापूसच्या खालोखाल कर्नाटकच्या आंब्याने मार्केट व्यापलेले असते. एपीएमसी मार्केटमधील प्रत्येक विंगमधील गाळ्यागाळ्यावर हापूस आंब्यांनी जागा व्यापलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातून रत्नागिरी, लांजा, राजापूर भागातून तर सिंधुदुर्गचा देवगड हापूस विक्रीला आला आहे. रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी भागातूनही हापूस आंबा विक्रीला आला आहे. जानेवारी महिन्यापासूनच हापूस आंब्याची मार्केटला तुरळक आवक येण्यास सुरुवात होते, एप्रिलच्या मध्यापासून हापूस आंब्याची आवक वाढून दररोज लाखांच्या संख्येने हापूस आंब्याच्या पेट्या मार्केटमध्ये विक्रीला येत असतात. आवक वाढल्यावर याच कालावधीत हापूस आंब्याचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतात. मार्केटमध्ये कोकणच्या हापूस आंब्याव्यतिरिक्त केरळ, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातूनही काही प्रमाणात 'हापूस' सदृश आंबा विक्रीसाठी येत असतो. दरवर्षीच्या तुलनेत हापूस आंब्याची आवक कमी झालेली आहे. फुलोऱ्याच्या वेळी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि कीड हल्ल्यांमुळे आंब्याच्या काढणीला विलंब झाला असून, रत्नागिरी आणि देवगड हापूसची आवक घटली आहे आणि शहरभरातील हंगामाच्या सुरुवातीच्या पुरवठ्याचे स्वरूप बदलले आहे. आंबा आवकच मंदावल्याने किमती गगनभरारी घेत आहेत. हापूसचे दर ५ ते ९ डझनाच्या पेटीचे २ ते ८ हजार रुपये आहेत. आखाती युद्ध सुरू असल्याने हापूस आंब्याची हक्काची बाजारपेठ ओळखली जाणाऱ्या आखाती देशांमध्ये हापूसची निर्यात अजून सुरू झालेली नाही व युद्धामुळे लवकर निर्यात होण्याची शक्यताही नाही. त्यामुळे स्थानिक बाजारातील मार्केटमध्ये आंबा विकला जाणार असल्याने यंदा खवय्यांना आंबा मुबलक प्रमाणावर उपलब्ध होणार आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मुंबई शहर व उपनगरामध्ये जवळपास ३२ कोटी ५० लाख रुपयांच्या आंब्याची विक्री झाली आहे. यामध्ये १० कोटी रुपयांच्या कर्नाटक आंब्याची, तर उर्वरित २२ कोटी ५० लाख रुपयांच्या कोकणमधून आलेल्या हापूस आंब्याची विक्री झालेली आहे. युरोपीय देशांमधून हापूस आंब्याला फारशी मागणी नसल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आखाती देशांमधील बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागत आहे. आखाती युद्धामुळे रमजानचा महिना असतानाही अन्य फळांची विक्री न झाल्याने फळ उत्पादकांना यंदा प्रचंड फटका बसला आहे. इराण आपला फळांचा मुख्य ग्राहक असून कलिंगड, डाळिंबसह अन्य भारतीय फळांना रमजानच्या महिन्यात इराणमधून सर्वाधिक मागणी असते. त्याखालोखाल अन्य आखाती देशांतून विशेषत: दुबईतून अधिक मागणी असते. सध्या आखाती युद्ध सुरू असल्याने निर्यातदार व्यापाऱ्यांचे नुकसान प्रचंड झाले आहे. त्यांना शेतकऱ्यांच्या बागा विकत घेऊन त्यातील आंबे आता स्थानिक बाजारांमध्ये विकण्याची वेळ आलेली आहे. हापूसला असलेली मागणी व मिळणारा दर पाहून देशातील अन्य आंबा हापूसच्या नावाखाली विकण्याचा प्रकारही काही ठिकाणी होत असतो. खऱ्या खवय्यांना हापूस आंबा लगेच ओळखता येतो आणि इतरांच्या नशिबी फसगत येते. कोकणचा हापूस हा रंगावरून नाही तर गंधावरून ओळखता येतो. त्यामुळेच हापूस घेताना आधी वास घ्या, रंग पाहू नका. खऱ्या कोकण हापूसला एक तीव्र, नैसर्गिक सुगंध असतो जो दुरूनही जाणवतो, अशी माहिती आंबा खवय्यांकडून देण्यात येते. पिकल्यावर हापूस आंबे गडद केशरी-पिवळे असतात. ते कधीही निस्तेज किंवा डागाळलेले नसतात. आंब्याची पातळ, नाजूक त्वचा जी स्पर्शाला मऊ आणि मुलायम वाटते. हापूसच्या नावाखाली स्थानिक बाजारामध्ये अधिक नफा कमविण्यासाठी अन्य जातीचे आंबे बनावट हापूस म्हणून विकण्याचा प्रकार घडत असतो. जाड साल, अधिक टणकपणा, अधिक तंतुमय पोत आणि लक्षणीयरीत्या कमी सुगंध ही अल्फोन्सो नावाने विकल्या जाणाऱ्या दक्षिणेकडील जातींची वैशिष्ट्ये आहेत. एपीएमसी मार्केट, दादर मार्केट, क्रॉफर्ड मार्केट आणि मुंबई शहर व उपनगरातील आंबा व्यापारी ग्राहकांची आंबा मागणी पूर्ण करण्यासाठी दक्षिणेकडील आंब्यांच्या जातीचा साठा करत आहेत, तर दुसरीकडे अस्सल देवगड हापूस दुर्मीळ, महागडा असून खरेदीदारांना तो ओळखणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहिरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करून पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ | ३



# रोजगार सहाय्यकांचे कामबंद

## ई-केवायसी, फेस ऑथेंटिकेशनसह तांत्रिक अडचणी; मानधन वाढीचा निर्णयही रखडला


**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



मूर्तिजापूर : विकसीत भारत जी रामजी योजनेअंतर्गत कार्यरत ग्राम रोजगार सहाय्यकांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने तालुक्यातील सर्व रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिल २०२६ पासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात गटविकास अधिकारी, पंचायत समिती मूर्तिजापूर यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे नाव बदलून विकसीत भारत जी रामजी योजना करण्यात आल्यानंतर कामकाजात मोठे बदल करण्यात आले आहेत. या अंतर्गत सर्व जॉबकार्ड धारकांचे ई-केवायसी तसेच एनएमएमएस ॲपद्वारे मजुरांची उपस्थिती नोंदविण्यासाठी चेहरा आधारित प्रमाणीकरण प्रणाली सुरू करण्यात आली आहे. मात्र, ग्रामीण भागात अनेक ठिकाणी नेटवर्कची समस्या असल्याने या प्रणालीची अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण होत असल्याचे रोजगार सहाय्यकांनी नमूद केले आहे. मजुरांनी कामाची मागणी केल्यानंतर त्यांना वेळेत काम उपलब्ध करून देणे हा कायद्याचा भाग आहे. परंतु, तांत्रिक अडचणींमुळे काम देण्यात विलंब झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. यामुळे योजना सुरळीतपणे चालेल की नाही, याबाबत रोजगार सहाय्यकांमध्ये संभ्रम व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, ग्राम रोजगार सहाय्यकांचे काम शासन निर्णयानुसार अर्धवेळ असताना नव्याने लागू करण्यात आलेल्या फेस ऑथेंटिकेशन प्रणालीमुळे कामाचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक गावांमध्ये एकाच वेळी २० ते ३० वैयक्तिक कामे सुरू असतात. ही कामे २ ते ३ किलोमीटर अंतरावर विखुरलेली असल्याने दिवसातून दोन वेळा उपस्थिती नोंदविणे अत्यंत कठीण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. याशिवाय, शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी ग्राम रोजगार सेवकांना ८ हजार रुपये मानधन व २ हजार रुपये प्रवास भत्ता देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाला तब्बल १८ महिने उलटूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे रोजगार सहाय्यकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या निवेदनावर गौतम खिराडे , वैभव पाटेकर , नाजुक खंडारे ,शुक्राचार्य सरदार, भीमराव खंडारे ,धिरज इंगळे , संतोष तायडे ,राजेश हेंगड , मकील बीन युनूस , सुरज मोहोळ ,राहूल नाईक , बळवंत इंगळे ,विजय झिंजुर्डे , संजय जोगदंड , शुध्दोधन वानखडे , किशोर गोपकर, शाम वाघ ,. प्रीतम सरोदे, अंबादास घोरमोडे, राहूल तायडे, संजु वाकोडे यांच्या स्वाक्षऱ्या असून सदर सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत मूर्तिजापूर तालुक्यातील रोजगार सहाय्यकांनी कामबंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला असून, प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# बस स्थानक चौक धोक्याचा हॉटस्पॉट

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**



शहरात सध्या वाढत्या ट्रॅफिकमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, विशेषतः बस स्थानक चौक, दत्त चौक आणि नागमोडी भागात वाहतुकीचा ताण प्रचंड वाढलेला दिसून येत आहे. नियोजनाचा अभाव आणि नियमांचे उल्लंघन यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे.

शहरात अनेक हॉटेल समोर वाहनाचे ट्रॅफिक दत्त चौक आर्णी रोड दारव्हा रोड परिसरात दिसत आहे मिळालेल्या माहितीनुसार, वेळेच्या आधीच शहरात जड वाहनांची बिनधास्त वर्दळ सुरू होते. सकाळपासूनच ट्रक, डंपर आणि इतर अवजड वाहनांचा सैराट सुरू असल्याने लहान वाहनधारक आणि पादचाऱ्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, बस स्थानक चौक हा अपघातांचा हॉटस्पॉट बनत चालला आहे. येथे अनेक लहान-मोठे अपघात घडले असून, काही प्रकरणांमध्ये गंभीर दुखापतीही झाल्या आहेत. वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल व्यवस्था अपुरी असल्याचे तसेच पोलिसांची उपस्थिती कमी असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, "वाहतुकीवर कोणताही ठोस नियंत्रण नाही. जड वाहनांना वेळेचे बंधन नसल्याने दिवसभर गोंधळ उडतो. यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे."

दरम्यान, प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत बस स्थानक चौक आणि इतर गर्दीच्या ठिकाणी वाहतूक नियोजन सुधारावे, जड वाहनांच्या प्रवेशावर वेळेची मर्यादा घालावी आणि सिग्नल व्यवस्था सक्षम करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

- **शहरातील वाढत्या ट्रॅफिकच्या पार्श्वभूमीवर तातडीने उपाययोजना न झाल्यास, भविष्यात परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

## महत्त्वाचे

### मुलाकडून वडिलांवर काठीने हल्ला; मुर्तिजापुरात धक्कादायक प्रकार

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**

मुर्तिजापुर : शहरातील जुनी वस्ती, नवीन घरकुल परिसरात मुलानेच आपल्या वृद्ध वडिलांवर काठीने मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मुर्तिजापुर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी मुलाविरुद्ध कारवाई सुरू आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रामभाऊ गोविंदा ताबंडे (वय 68) हे दि. 1 एप्रिल रोजी रात्री सुमारे 11 वाजताच्या सुमारास आपल्या घराबाहेर झोपले होते. अचानक पाऊस सुरू झाल्याने त्यांनी घरात झोपण्यासाठी जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांचा मुलगा रवि रामभाऊ तांबडे (वय 37) याने संतापून वडिलांना शिवीगाळ केली. वाद वाढत गेल्याने आरोपीने घरातील लाकडी काठीने फिर्यादीवर हल्ला चढवला. या मारहाणीत ताबंडे यांच्या दोन्ही पायांच्या मांडीवर, पाठीवर तसेच चेहऱ्यावर गंभीर मार लागून ते जखमी झाले. जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून मुर्तिजापुर शहर पोलिस ठाण्यात कलम 118(1), 352 प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर घटनेचा पुढील तपास ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार अनिल राठोड करत आहेत.



### विद्यार्थ्यांचे 'चला खेळू या' उपक्रमात यश

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या "चला खेळू या" या नाविन्यपूर्ण क्रीडा उपक्रमांतर्गत निवड झालेल्या खेळाडूंसाठी 15 दिवसीय प्रशिक्षण शिबिरास 16 मार्चपासून प्रारंभ करण्यात आहे होता . जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण शिबिर 16 ते 30 मार्च 2026 या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, नेहरू स्टेडियम, गोधनी रोड, यवतमाळ येथे आयोजित करण्यात आले होते . या खेळात आपल्या महाविद्यालयातील वर्ग 11 वी (विज्ञान) शाखेतील विद्यार्थी आदित्य मारोती करण हा कुस्ती या खेळामध्ये सहभागी झाला होता ,त्याने नियमित सराव, शिस्त व प्रामाणिक प्रयत्न यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे त्यांचा यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष मा. श्री रंगराव काळे साहेब, सचिव सौ. अनिता काळे मॅडम व महाविद्यालयाच्या प्राचार्य कु. प्रांजली दिक्षित तसेच क्रीडा प्रमुख श्री. प्रवीण बेहेरे यांना दिले आहे तसेच पुढील वाटचालीसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी शुभेच्छा दिल्या.

# मार्गावर महाकाय झाड कोसळले

**प्रशासकीय दुर्लक्षामुळे अपघाताचे सावट**

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी-प्रदिप खंडारे**



आसेगाव पेन ते कोयाळी (खुर्द) आणि भिसडे या मुख्य मार्गावर काल,दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७:४० च्या सुमारास एक महाकाय झाड कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने, झाड कोसळले त्यावेळी मार्गावर मोठी वर्दळ नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, घटना घडून कित्येक तास उलटूनही प्रशासनाकडून हे झाड हटवण्यासाठी कोणतीही हालचाल झालेली नाही. या निष्काळजीपणामुळे हा मार्ग धोकादायक बनला असून, येथे कधीही गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मिळालेल्या माहितीनुसार, आसेगाव परिसरात काल सायंकाळी झालेल्या अकल्पित वातावरण बदलामुळे या मार्गावरील एक जुने झाड मुळासकट रस्त्यावर आडवे कोसळले. या झाडामुळे रस्ता पूर्णपणे अडकला असून वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. ग्रामीण भागातील हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असल्याने कोयाळी खुर्द, भिसडे आणि परिसरातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. शालेय विद्यार्थी, चाकरमानी आणि ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारां साठी हे झाड मृत्यूचा सापळा बनले आहे. अंधारामुळे समोर झाड असल्याचे लक्षात न आल्यास मोठा अपघात होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या रस्त्याची दुरवस्था आणि प्रशासनाचा ढिसाळ कारभार यावर संताप व्यक्त होत आहे. झाड पडल्याची माहिती स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित यंत्रणेला तातडीने दिली होती, तरीही अद्याप सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा महसूल विभागाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. साध्या झाडाची फांदी तोडण्यासाठी किंवा रस्ता मोकळा करण्यासाठी यंत्रणा पोहोचत नसेल, तर नागरिकांनी दाद कोणाकडे मागावी, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. सध्या या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, जर काही तासांत हे झाड बाजूला केले नाही, तर ग्रामस्थ तीव्र आंदोलन करतील. प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून तत्काळ हे झाड हटवावे आणि होणारी वाहतूक कोंडी दूर करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आता संबंधित जबाबदार अधिकारी यावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# न. प.चे 'वसुली पठाण' की सरकारी गुंड?

## पाणीपट्टीच्या नावाखाली महिलेला अर्वाच्य शिवीगाळ आणि जातीवाचक अपमान!

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी -प्रदिप खंडारे**




एकीकडे सरकार 'महिला सन्मान' आणि 'पारदर्शक प्रशासना'च्या गप्पा मारत असताना,वाशिम जिल्ह्यातील रिसोड नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी मात्र मोगलाई सुरू केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. केवळ पाणीपट्टीच्या थकबाकीसाठी घरापर्यंत पोहोचून कुटुंबातील महिलांना जातीवाचक शिवीगाळ करणे, दमदाटी करणे आणि जीवे मारण्याची धमकी देण्याचा संतापजनक प्रकार घडला असून,यामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.मिळालेल्या माहितीनुसार,रिसोड येथील रहिवासी सदानंद दगडू गायकवाड यांच्या घरी १७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास नगर परिषदेचे कर्मचारी अमजद खान दारीफ खान पठाण हे पाणीपट्टी वसुलीसाठी आले होते.सदानंद गायकवाड हे घराच्या वरच्या मजल्यावर असताना,खाली त्यांच्या पत्नी निशा गायकवाड आणि आई होत्या.वसुलीच्या नावाखाली आलेल्या या कर्मचाऱ्यांनी कोणतीही नोटीस किंवा पूर्वसूचना न देता थेट अर्वाच्य भाषेत संवाद साधण्यास सुरुवात केली.

सदानंद गायकवाड यांना खाली येण्यास काही मिनिटे उशीर झाला, इतक्या क्षुल्लक कारणावरून कर्मचारी अमजद खान याने आपला तोल गमावला. त्याने गायकवाड यांच्या पत्नी आणि आईला अत्यंत खालच्या थराची,जातीवाचक शिवीगाळ केली. इतकेच नाही तर, "तुमचा लगेच कार्यक्रम लावतो"अशी धमकी सुद्धा दिली.

### लोकायुक्तांकडे धाव आणि निलंबनाची मागणी

- **स्थानिक पातळीवर न्याय मिळत नसल्याने अखेर सदानंद गायकवाड यांनी मुंबई येथील लोकायुक्त कार्यालय,मानवी हक्क आयोग, अनुसूचित जाती जमाती कार्यालय,नगर विकास सचिव यांच्या कडे धाव घेतली आहे. या अर्जासोबत त्यांनी वृत्तपत्रातील कात्रणे आणि एफ.आय.आर.ची प्रतही जोडली आहे. संबंधित दोन्ही कर्मचाऱ्यांना सेवेतून तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.**

# मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर बसवण्याची मागणी

## ग्रामस्थांचे लेखी निवेदन; "ब्रेक" लागणार कधी ?नागरिकांचा सवाल



**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:-**

चांदुर बाजार तालुक्यातील शिरसगाव कसबा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील नागरिकांनी मुख्य रस्त्यावर तातडीने स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी लेखी मागणी १२ जानेवारी २०२६ ला ग्रामपंचायत प्रशासनाकडे केली आहे.

हा चौक वॉर्ड क्रमांक १,२,३ व ४ अश्या चारही वार्डच्या मध्यभागी असून या चौकातून गावातील मुख्य रस्ता जात असल्याने वाहनांची वर्दळ दिवसेंदिवस वाढत आहे.परिसरात मंदिरे,शासकीय शाळा तसेच रहिवासी वस्ती असल्यामुळे लहान मुले,विद्यार्थी,महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांची सतत ये-जा असते.

निवेदनानुसार, मागील काही काळात वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे पालन होत नसल्याने किरकोळ अपघातांच्या घटना घडल्या आहेत. काही वेळा वाहनांच्या धडका झाल्याने वाद निर्माण झाले असून भविष्यात गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही,अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे,येथील एका नालीवरील पूल हा पूर्णपणे नालीच्या पृष्ठभागाला टेकल्यामुळे नालीचे पाणी ओवरफ्लो होऊन अनेकदा रस्त्यावरून वाहते.तो पूल तोडून नव्याने त्याची निर्मिती करावी. या चौकातील प्रत्येक रस्त्यावर योग्य ठिकाणी कॉंक्रीटयुक्त किंवा फायबर युक्त रबर पॅच ब्रेकर ची निर्मिती करण्यात यावी.

- **निवेदनानुसार,नागरिकांनी तत्कालीन सरपंच यांना मौखिक माहिती दिल्याचे नमूद केले आहे.२०२४ मध्ये त्याच रस्त्याचे कॉंक्रीट नूतनीकरण सुरू असताना परिसरातील नागरिकांनी तत्कालीन सरपंच यांना नाली व स्पीड ब्रेकर संबंधी सुचविले की चालू कामात दुरुस्ती व्यवस्थित होते. पण त्यांनी पुढील काही दिवसांत करून देऊ,असे सांगितले.मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याचे निवेदनात नमूद आहे.**
- **सध्या तिथे अशी अडचण नाही आहे.वेळोवेळी कर्मचाऱ्यांकडून साफसफाईचे कामे केल्या जातील.सदर काम नियोजनात घेऊन निधी प्राप्त होताच काम केले जाईल.**
  **- सुरेश रेखाते ग्रा.पं. अधिकारी, शि.कसबा**
- **मौखिक सुचवूनही काम झाले नसल्याने निवेदन दिले.ग्रामसेवक यांना विचारणा केली असता सुद्धा काही नियोजन नाही, पुढे काम करू असे सांगितले. सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात. अनिल गुप्ता ग्रामस्थ, शि.कसबा**

# प्रशासनाकडून तीर्थक्षेत्र परिसराची अखेर स्वच्छता

## माध्यमांनी दिलेल्या वृत्ताची घेतली दखल.



**▸विदर्भ केसरी। मानोरा--**

तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पोहरादेवीतील अस्वच्छते संदर्भात विविध वृत्तपत्रांनी प्रकाशित केलेल्या वृत्ताची दखल घेत महसूल प्रशासनाने स्वच्छता अभियान राबविल्याने या पवित्र स्थळाच्या सौंदर्यात भर पडले असल्याची मत स्थानिक नागरिक व बाहेरून येणाऱ्या श्रद्धाळूंच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

महसूल प्रशासनाच्या या उपक्रमामुळे येथील साफसफाई मुळे येथे रोगराई पासून गावकरी व भावीक भक्तांना मोठा दिलासा मिळाल्याने महसूल प्रशासनाने एक चांगला पाऊल उचलल्याचे सांगत स्थानिक महाराज परिवारातील सदस्यांनी महसूल प्रशासनाचा आभार व्यक्त केला आहे.

- **विविध वृत्तपत्रांनी पोहरादेवी यात्रोत्सवा पश्चात व्यापाऱ्यांद्वारा टाकण्यात आलेला प्रचंड प्लॅस्टिकच्या कचऱ्यामुळे प्रदूषणात वाढ व अनेक गाई या कचऱ्यामुळे दगावल्याचे वृत्त सलग प्रकाशित केले होते. वृत्त पत्रात प्रकाशित झालेल्या बातमीमुळे खडबडून जागे झालेल्या तालुका प्रशासनाने पोहरादेवी या तीर्थक्षेत्र समवेतच तालुक्यातील इतरही तीर्थक्षेत्रांमध्ये प्रदूषणास कारण ठरणाऱ्या ठरणारा कचरा फेकण्यात येऊ नये यासंदर्भात भविष्यात जनजागृती करण्याची मागणी सुद्धा या निमित्याने पुढे येत आहे.**

मागील पंधरा-वीस वर्षापासून तीर्थक्षेत्र पोहरादेवीत भाविकांचा ओढा वाढला असल्याने येथे येणाऱ्या भाविक भक्त वेगवेगळी नवस फेडतात येथे धूप अगरबत्ती व नारळाच्या खच पडला जातो तसेच कागद,प्लास्टिक यांचा वापर जास्तडॉ.रामराव होत असल्यामुळे काशीची स्वच्छता राखने संस्थेला जिकिरीचे होत होते.

महसूल प्रशासनाने तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथील भाविक भक्तांच्या आवा गमनामुळे येथे झालेल्या कचऱ्याची साफसफाई राबवून एक चांगला उपक्रम राबविल्याने यात्रेत संत सेवालाल महाराज माता, जगदंबा मंदिर, तपसी संत डॉ.रामराव महाराज यांचे समाधी स्थळ आणि संत बामनलाल महाराज मंदिरा समोरील मोकळी जागा परिसरात झालेली कचऱ्याची स्वच्छता राबवीत पोहरादेवी व मंदिर परिसर आज स्वच्छ केले आहे या उपक्रमात तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी आपल्या संपूर्ण टिम सह आज सकाळी ६ वाजता पासून स्वच्छता अभियान ला सुरुवात केली.या स्वच्छता अभियानात काही खाजगी आस्थापना व स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सुद्धा सहभाग नोंदविला होता.

# कर्तृत्वाला सलाम... प्रेरणादायी सन्मान सोहळा पुण्यात संपन्न

**▸विदर्भ केसरी। पुणे**



कर्तृत्व, समर्पण आणि निस्वार्थ सेवाभाव यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळावा असा अविस्मरणीय क्षण पुण्यात अनुभवायला मिळाला. महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी सन्मान सोहळा 2026, ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी, पुणे येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

दैनंदिन कामाच्या चौकटीत राहूनही काहीजण आपल्या कर्तृत्वाने वेगळा ठसा उमटवतात... अशाच असामान्य कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सन्मानाचा हा सोहळा होता. प्रत्येक सन्मानामागे संघर्षाची कहाणी, मेहनतीची पराकाष्ठा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ दडलेली होती. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ औपचारिक न राहता उपस्थितांच्या मनाला स्पर्श करणारा ठरला.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. ना. प्रकाश आबिटकर साहेब उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र स्वीकारताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि डोळ्यांतील समाधान हा त्या कष्टांचा खरा सन्मान होता. सभागृहात दुमदुमणाऱ्या टाळ्यांच्या गजरात प्रत्येक यशोगाथेला मानाचा मुजरा देण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून ई. रवींद्रन, भा.प्र.से. (सचिव २, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई), श्री रमेश चव्हाण, भा.प्र.से. (आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुंबई), डॉ. अशोक थोरात, संचालक, (वैद्यकीय) तसेच श्री सोहम वायाळ, संचालक, (प्रशासन) यांची मान्यवर उपस्थिती कार्यक्रमाला अधिक उंची देणारी ठरली. या सन्मान सोहळ्यात अमरावती जिल्ह्यातील राज्य कामगार विमा सोसायटीत कार्यरत असलेल्या स्नेहा बारसागडे (स्नेहा सुरजकुमार चौरपगार) यांचा विशेष गौरव करण्यात आला. शांतपणे, निष्ठेने आणि जबाबदारीने केलेल्या त्यांच्या कार्याची ही योग्य दखल होती. त्यांच्या या यशाने केवळ त्यांच्याच नव्हे, तर अनेक तरुणांसाठी प्रेरणेचा दीप प्रज्वलित केला आहे. त्या श्री विजयकुमार चौरपगार (राज्य संघटक, भारतीय बौद्ध महासभा) यांच्या स्नुषा असून, त्यांच्या कुटुंबासाठी हा क्षण केवळ सन्मानाचा नव्हे, तर आयुष्यभर जपून ठेवावा असा अभिमानाचा ठेवा ठरला. स्नेहा चौरपगार यांच्या यशामागे मा. डॉ. उज्वला माळवे (वैद्यकीय प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, अमरावती) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यासोबतच कुटुंबियांचे पाठबळ, अथक परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले आहे.

यावेळी वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालय अमरावती अंतर्गत कार्यरत डॉ प्रीती काटे, डॉ अभिजित कावरे, श्री दुर्गेश वानखडे, श्री योगेश कोल्हे, श्री गजानन गोतमरे, श्री राजेश राक्षे यांचा सुद्धा आरोग्यमंत्री महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला..

सर्व अधिकारी कर्मचारी यांच्या कामाचे मंत्रीमहोदय यांनी कौतुक केले. हा सन्मान सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता, "आपणही काहीतरी वेगळं करू शकतो" हा आत्मविश्वास प्रत्येकाच्या मनात रुजवणारा ठरला. कर्तृत्वाची दखल घेतली जाते, याची जाणीव मनाला नवी ऊर्जा देऊन गेली. अशा प्रेरणादायी उपक्रमांमुळे समाजात सकारात्मकता वाढीस लागते आणि सेवाभावाला नवी दिशा मिळते. हा सोहळा प्रत्येकाच्या मनात दीर्घकाळ प्रेरणेचा दीप उजळत ठेवणारा ठरला, यात शंका नाही.

# लोखंडी फायटरने हल्ला; किराणा दुकानदार जखमी

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

मूर्तिजापूर : शहरातील स्टेशन विभागात किराणा दुकानदारावर लोखंडी फायटरने हल्ला करून जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मयुर शिवाजी सुपले (वय ३५, रा. तिडकेनगर, मूर्तिजापूर) हे १ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १० वाजताच्या सुमारास आपल्या 'आशा प्रोव्हिजन' या किराणा दुकानात नेहमीप्रमाणे काम करत होते. यावेळी आरोपी गोलु गणेश जाधव व विकी उर्फ रूशी प्रभाकर किर्दक (दोघेही रा. वडरपुरा, स्टेशन विभाग) हे दुकानासमोर आले. यावेळी गोलु जाधव याने हातातील लोखंडी फायटरने सुपले यांच्या छाती, मान व नाकावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच विकी किर्दक याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. पुढे विकी याने खिशातून चाकू काढून वार करण्याचा प्रयत्न केला; मात्र फिर्यादीच्या भावाने तत्परता दाखवत त्याला बाजूला ढकलल्याने मोठा अनर्थ टळला. दरम्यान, आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोस्टे मूर्तिजापूर शहर येथे कलम ११८(१), ३५१(३), ३५२ बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी शेख इरफान करीत आहेत.

## माकडांची शिस्तबद्ध महापंगत



अकोला : हनुमान जयंतीनिमित्त भाविक भक्तांसाठी सर्वत्र महाप्रसाद आयोजित करण्यात येतो. अकोला जिल्ह्यात मात्र एक अनोखी महापंगत सर्वांचे लक्ष वेधून घेते. जिल्ह्यातील कोथळी बु. येथे गुरुवारी माकडांची शिस्तबद्ध पंगत बसली. वानरसेनेने रांगेत बसून स्टीलच्या ताटात प्रसाद ग्रहण केला. या अनोख्या महाप्रसादाची चांगलीच चर्चा होत आहे. हनुमान जन्मोत्सवानिमित्त वानरसेनेला मेजवानीच मिळाली.

## महत्त्वाचे



### शहर पोलिसांनी शोधले १४ मोबाइल

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

दैनंदिन जीवनात गरजेची वस्तू बनलेल्या मोबाइलवर चोरटे डोळा ठेवून आहेत. तसेच ही वस्तू हरविण्याचेही प्रकार वाढले आहेत. एकदा हरवलेला मोबाइल परत मिळेलच, याची काहीही खात्री राहिलेली नाही. पण अशाही स्थितीत यवतमाळ शहर पोलिसांनी १४ मोबाइल शोधून ते मूळ मालकांना परतही केलेत. गुरुवारी (दि. २) शहर पोलिस ठाण्यात मूळ मालकांना पाचारण करुन हे मोबाइल त्यांना सहीसलामत परत करण्यात आले. पोलीस अधिक्षक कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून पोलीस व जनता यांच्यातील संबंध दृढ करण्यासाठी 'पोलीस समन्वय' ही संकल्पना राबविली जात आहे. त्यातच जिल्हा पोलीस दलाकडून ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत मोबाईल वाटपाचा कार्यक्रम गुरुवारी पार पडला.

शहर पोलिस ठाण्यात गेल्या काही दिवसात मोबाइल हरविल्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. पोलिसांनी सीइआयआर पोर्टलच्या माध्यमातून त्या मोबाइलचा शोध घेतला. त्यामध्ये एकूण १४ मोबाईल (किंमत अंदाजे १ लाख ७३ हजार) मिळाले. हे मोबाइल गुरुवारी पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या हस्ते परत करण्यात आले.

ही कार्यवाही पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनात शहर ठाणेदार रामकृष्ण जाधव, रविंद्र नेवारे, अंकुश फेंडर यांनी पार पाडली.

### महिलेला बोलेरोची धडक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

पायदळ जात असलेल्या एका ४० वर्षीय महिलेला भरधाव बोलेरो पीकअप (एमएच २६ बीड ०५७४) वाहनाने मागून जोरदार धडक दिली. हा अपघात पुसद शहरातील सागर ड्रायफ्रूट समोरील रोडवर घडला. जानकी संतोष डागर (४०) रा. गणेश वार्ड पुसद असे यात जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. जानकी डागर यांच्या फिर्यादीवरुन पुसद शहर पोलिस ठाण्यात बोलेरो पीकअप चालकावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### मोटार लंपास

यवतमाळ : शेतात सिंचनासाठी लावलेली ८ हजार रुपये किमतीची मोटार अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही चोरी राळेगाव तालुक्यातील झाडगाव शिवारात २५ ते २६ मार्चदरम्यान घडली. या प्रकरणी शेतकरी हनुमान अजाबराव डोंगरे (४४) रा. झाडगाव यांनी राळेगाव पोलिसात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा नोंदविला आहे.

### पाटापांगरा शिवारात मोटारपंपाची चोरी

यवतमाळ : शेतशिवारातील विहिरीवर बसलेली १२ हजार रुपये किमतीची मोटार अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही चोरी घाटंजी तालुक्यातील पाटापांगरा शेतशिवारात २६ ते २९ मार्चदरम्यान घडली. या प्रकरणी शेतकरी अमोल रमेश डेहणकर (४०) रा. पाटापांगरा यांनी पारवा पोलिसात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा नोंदविला आहे.

# रॉयल्टी लाठी, तोहगावं ची आणि मुरूम गोंडपिपरीत फस्त

### महसूल विभागाच्या नाकाखाली तस्करांचा टाईम गेम

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**





चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यात गौण खनिजाची अवैध वाहतूक आणि रॉयल्टीची चोरी हा प्रकार नवा नाही, मात्र आता मुरूम तस्करांनी महसूल विभागाच्या डोळ्यात धूळ फेकत एक नवी शक्कल लढवली आहे. तोहगाव आणि लाठी येथील रॉयल्टीचा वापर करून गोंडपिपरी शहरात मुरूम फस्त करण्याचा मोठा प्रकार उघडकीस आला असून, यात महसूल विभागाचे अधिकारी ढिम्म भूमिकेत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मिळालेल्या पुरावाच्या आधारावर गोंडपिपरी तालुक्यातील व्यंकटपूर शिवारातील सर्वे क्रमांक १६२ मधून मुरूम खोदण्यासाठी भालचंद्र बोधलकर नावाच्या व्यक्तीने १०० ब्रासची रॉयल्टी काढली होती. मात्र, ही रॉयल्टी काढताना तांत्रिक खेळी खेळण्यात आली. ही रॉयल्टी तोहगाव आणि लाठी या दूरच्या गावांसाठी दाखवण्यात आली. नियमानुसार, लांबच्या अंतरासाठी रॉयल्टीवर साधारणतः दोन तासांचा अवधी मिळतो. याच दोन तासांच्या वाढीव वेळेचा गैरफायदा घेत गोंडपिपरी शहरात अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर एकाच रॉयल्टीवर ५ ते ६ फेऱ्या (ट्रिप) मारल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

तस्करांनी 'टाईम मॅनेजमेंट'चा असा काही वापर केला की, कागदोपत्री १०० ब्रासची रॉयल्टी असताना प्रत्यक्ष आष्टी चंद्रपूर मार्गावरील चिंतामणी कॉलेज जवळील लेआउटवर व गोंडपिपरी शहरात ५०० ते ६०० ब्रास मुरूम टाकण्यात आला आहे.लाठी,तोहगावची रॉयल्टी दाखवून गोंडपिपरीच्या जवळच्या लेआउटवर मुरूम रिकामी करणे आणि पुन्हा त्याच वेळेत दुसरी खेप भरणे, असा हा गोरखधंदा सुरू होता जर या लेआउटवर व शहरात जाऊन प्रत्यक्ष मोजमाप केले आणि तिथल्या मुरुमाच्या साठ्याची पडताळणी केली, तर हा मोठा घोटाळा समोर येऊ शकतो. एकीकडे सामान्य माणसावर किरकोळ कारणावरून दंडात्मक कारवाई करणारा महसूल विभाग इतक्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या अवैध उत्खननाकडे डोळेझाक का करत आहे? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे

#### गड्ड्यांचे मोजमाप होणार का?:

- **ज्या ठिकाणाहून मुरूम काढला गेला, त्या गड्ड्यांचे मोजमाप केल्यास किती ब्रास उपसा झाला हे स्पष्ट होईल.**

#### लेआउटची तपासणी होणार का?:

- **गोंडपिपरी शहरातील व ज्या लेआउटवर हा मुरूम टाकला गेला, तिथल्या मालकांकडे टीपी (Transit Pass) ची मागणी केली तर रॉयल्टीचा घोळ उघड होईल.**

#### हितसंबंधांची चर्चा

- **मुरूम तस्कर आणि महसूल विभागाच्या काही कर्मचाऱ्यांचे साटेलोटे असल्याशिवाय इतका मोठा प्रकार घडणे अशक्य आहे, अशी चर्चा सध्या परिसरात रंगली आहे. जर महसूल विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली नाही आणि संबंधित लेआउटवर किंवा शहरात जाऊन पडताळणी केली नाही, तर हे प्रकरण दाबले जाण्याची दाट शक्यता आहे.**
- **आता चेंडू महसूल प्रशासनाच्या कोर्टात आहे. वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित तस्करावर कठोर कारवाई करणार की गौण खनिजाची ही लूट अशीच सुरू राहणार? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. जर कारवाई झाली नाही, तर महसूल विभाग आणि मुरूम तस्करांचे हितसंबंध असल्याचे शिक्कामोर्तब होईल, हे मात्र निश्चित.**

## संशयातून एकाची हत्या, तिघे गंभीर; भररस्त्यात झाला राडा



**▸विदर्भ केसरी। चंद्रपूर :**

#### वाटेतच सोडला दम

- **कोयना गेट परिसरात भांडण झाल्याची माहिती मिळताच दुर्गापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, परिविक्षाधीन आयपीएस अधिकारी गौरव कायंदेपाटील व त्यांचे पथक घटनास्थळावर दाखल झाले. त्यांनी यशला रक्तबंबाळ अवस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले, मात्र वाटेतच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी दुर्गापूर पोलिसांनी चिमणकर याच्यावर हत्येचा गुन्हा, तर यशच्या मित्रांवर हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला असल्याची माहिती दुर्गापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, परिविक्षाधीन आयपीएस अधिकारी गौरव कायंदेपाटील व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांनी दिली. पुढील तपास दुर्गापूर पोलीस करत आहेत.**

चारित्र्याच्या संशयावरून झालेल्या वा दातून भररस्त्यात एका तरुणाची चा कूने भोसकून हत्या केल्याची खळबळजनक घटना गुरुवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास दुर्गापुरातील कोयना गे ट जवळ घडली.यश हरिदास फाले (२५) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणात आरोपी प्रफुल चिमणकरसह मृत यशचे मित्र अंशुल रायपुरे, अभी रायपुरे (सर्व रा. ऊर्जनगर, वॉर्ड क्र. ५) हे जखमी झाले आहेत.

चिमणकर यांना पत्नीचे यशच्या वडिलांशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. सततच्या वादातून प्रफुल चिमणकर हे पत्नीपासून विभक्त राहत होते. बुधवार दि. १ एप्रिलच्या रात्री चिमणकर यांची पत्नी अचानक घरी आली, मात्र संशयाच्या कारणावरून त्यांच्यात पुन्हा वाद झाला. गुरुवारी सकाळी यश आपले मित्र अंशुल व अभी यांच्यासोबत कोयना गेट परिसरातील हनुमान मंदिरात जेवण करण्यासाठी गेला होता. तेथून परत येताना ते चिमणकर यांच्या नाश्ता सेंटरवर थांबले. तिघांनी लस्सीसुद्धा पिली. दरम्यान, यशने बुधवारच्या भांडणाचा चिमणकर यांना जाब विचारला. यावरून दोघांत बाचाबाची झाली. दरम्यान, यशने चिमणकर यांच्या डोक्यावर काचेचा ग्लास फोडला, तर चिमणकरने बर्फ फोडण्याचा धारदार सुरा यशच्या पोटात खुपसला. या वादात यशचे मित्रसुद्धा जखमी झाले.

## महसूलात कोटींची भर

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

केंद्र सरकारकडून देशातील मोठ्या घटकाला स्वस्त दरात धान्य देण्यात येत आहे. रोजगार उपलब्ध होत नसल्याने बेरोजगारांची संख्या वाढत असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे. त्याच प्रमाणे देशातील गरिबांच्या संख्याही वाढत जात असल्याची टीका होते. काही मोजक्यांच्या हातातच धनसंपदा जमा होत असल्याच आरोप नेहमीच होत असते. परंतु दुसरीकडे लोकांची आर्थिक क्षमता वाढत असल्याचे चित्र आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. एकट्या नागपुरातील नागरिकांनी शासनाला वर्ष भरात २२९९ कोटी रुपये दिले. नागपूर जिल्ह्यात घर, जमीन खरेदी करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचे चित्र आहे. मागील वर्षीच्या तुलनेत मालमत्ता खरेदी करणाऱ्यांच्या संख्येत १० हजारापेक्षा अधिकची वाढ आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्ह्यात १ लाख ८१ हजार १० जणांनी मालमत्ता खरेदी केल्या. वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत खरेदी करणाऱ्यांच्या संख्येत जवळपास १२ हजारांची वाढ झाली

## वसंत खंडारे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार





**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना दिला जाणारा यंदाचा (२०२५-२६) महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार संग्रामपूर पंचायत समिती अंतर्गत पातुर्डा खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक वसंत सदाशिव खंडारे यांना प्रदान करण्यात आला. पुणे (निगडी) येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृहात आयोजित एज्युकेशन आयकॉन्स समिटमध्ये रविवार २९ मार्च रोजी झालेल्या सोहळ्यात शिक्षणतज्ज्ञ दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधून निवड झालेल्या शिक्षकांमध्ये खंडारे यांचा समावेश असून, त्यांनी उत्कृष्ट अध्यापन, विद्यार्थ्यांप्रती निष्ठा आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्या जोरावर मानाचे स्थान मिळविले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारे उपक्रमशील शिक्षक म्हणून त्यांची ओळख असून, त्यांच्या या यशामुळे संग्रामपूर तालुक्याचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल झाले आहे.

## पदवी वितरण समारंभ उत्साहात

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**



: येथील श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालयात दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी पदवी वितरण समारंभ मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. या सोहळ्याला विद्यार्थिनी, पालक व मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चौखंडे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून जिजामाता महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती कांचनमाला पाटील गावंडे उपस्थित होत्या. यावेळी जिजामाता महिला मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. रजनीताई ताले, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रा. गुलाबरावजी कळस्कर व अण्णासाहेब रेचे यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. यावेळी एकूण ३२ स्नातक विद्यार्थिनींना, तसेच राज्यशास्त्र विषयातील २९ व गृहअर्थशास्त्र विषयातील ३ स्नातकोत्तर विद्यार्थिनींना पदव्या प्रदान करण्यात आल्या. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे राज्यशास्त्र विभागातील सर्व २९ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. प्रमुख अतिथी श्रीमती कांचनमाला गावंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थिनींनी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी, तसेच मोबाईल व सोशल मीडियाचा वापर शैक्षणिक उद्देशांसाठी करावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अविनाश चौखंडे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. देवीलाल आठवले व डॉ. हरिदास आखरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. के. ए. गावंडे, प्रा. अर्चना तिवारी, डॉ. दिलीप मोरे, डॉ. गजानन हेरोळे, डॉ. शुभांगी इंगोले, प्रा. अनंत गावंडे, डॉ. चंदा खंडारे तसेच इतर प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. एकूणच हा पदवी वितरण समारंभ प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला

### महिलेला बोलेरोची धडक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

पायदळ जात असलेल्या एका ४० वर्षीय महिलेला भरधाव बोलेरो पीकअप (एमएच २६ बीड ०५७४) वाहनाने मागून जोरदार धडक दिली. हा अपघात पुसद शहरातील सागर ड्रायफ्रूट समोरील रोडवर घडला. जानकी संतोष डागर (४०) रा. गणेश वार्ड पुसद असे यात जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. जानकी डागर यांच्या फिर्यादीवरुन पुसद शहर पोलिस ठाण्यात बोलेरो पीकअप चालकावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## समाजोपयोगी व प्रेरणादायी उपक्रमांनी सुरेश नौकरकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**



**नागपूर कुही :** नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यातील डोंगरमौदा ग्रामपंचायतीचे सरपंच तथा सरपंच संघटना कुहीचे अध्यक्ष सुरेश किसन नौकरकर यांचा वाढदिवस यंदा अत्यंत वेगळ्या, समाजाभिमुख आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला. केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता, समाजासाठी काहीतरी अर्थपूर्ण करण्याचा संदेश देणारे विविध उपक्रम या निमित्ताने राबविण्यात आले.

वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळा, डोंगरमौदा येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण वाटत त्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, उत्साह आणि समाधान पाहून उपस्थित सर्वांच्या मनात एक वेगळीच भावना निर्माण झाली. लहान मुलांसोबत साधेपणाने साजरा केलेला हा वाढदिवस सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा महत्वाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपणाचा उपक्रमही मोठ्या उत्साहात पार पडला. "आज लावलेले झाड म्हणजे उद्याच्या पिढीसाठी दिलेली अमूल्य भेट," या विचारातून ग्रामपंचायत परिसरात व शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमामुळे पर्यावरणाबद्दलची जागरूकता वाढविण्यास मदत झाली.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमांमुळे वाढदिवसाला केवळ उत्सवाचे नव्हे, तर सामाजिक बांधिलकीचे आणि पर्यावरणपूरकतेचे स्वरूप प्राप्त झाले. ग्रामस्थ, शिक्षकवृंद व उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. सरपंच सुरेश किसन नौकरकर यांच्या या उपक्रमातून समाजाप्रती असलेली त्यांची जाणीव आणि कर्तव्यदक्षता अधोरेखित झाली.उपस्थित मान्यवरांनी त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीस यश लाभो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

## नांदगाव खंडेश्वर येथे पिएमस्वनिधि योजनेअंतर्गत लोककल्याण मेळावा संपन्न

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी: अमोल धवसे**





नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेअंतर्गत दिनांक २७ मार्च 2026 ला बारी समाज हॉल येथे लोककल्याण मेळावा आयोजित केला असता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगर पंचायत अध्यक्षा प्राप्तीताई मारोटकर होत्या ,तसेच प्रमुख अतिथी म्हणून माननीय सभापती स्वच्छता व आरोग्य सौ.ज्योत्सना अमोल धवसे, आणि वैभव कोंडवते नगरसेवक या प्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून नवजीवन समाज विकास संस्थेचे संचालक विलास आठवले तसेच नगरपंचायत च्या सहायक प्रकल्प अधिकारी उज्वला पोकळे यानी मार्गदर्शन केले. या लोक कल्याणकारी मेळाव्यात नगर पंचायतच्या अध्यक्षा प्राप्तीताई मारोटकर यांनी बचत गटाच्या महिलांनी तसेच गावातील फूटपाथ वरील व्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांनी, जास्तीत जास्त या पीएमस्वनीधी योजनेचा लाभ घेऊन कर्ज वेळेवर भरून शासनाच्या डिजिटल योजनेचा सुद्धा वापर करावा. त्याप्रसंगी आपलं मत त्यांनी व्यक्त केले .या कार्यक्रमाचे निमित्ताने योजनेच्या संदर्भात संस्थेचे संचालक विलास आठवले यांनी पीएमस्वनिधी योजना अंतर्गत लाभार्थ्यांसाठी भारत सरकार ने आठ योजना कार्यान्वित केल्या आहे, त्या आठ योजनेचा लाभ लाभार्थ्यांनी कसा घ्यायचा आहे . त्याकरिता लाभार्थ्यांचे प्रोफायलिंग आणि स्कीम लिंकेज करण्याचे काम सुरू आहे. त्याला मदत करावी व आपल्याला बँकेने पीएमस्वनिधी योजनेअंतर्गत घेतलेल्या कर्जाचे हप्ते पाडून दिलेले आहे. त्यानुसार जर कर्ज भरले तर ते कर्ज सुद्धा कसे फायद्याचे आहे. आणि आपले सिव्हिल हे सुद्धा चांगले राहते.आणि भविष्यात आपल्याला कुठल्याही अडचणी येणार नाहीत. तसेच भविष्यात एक लाखापर्यंतचा क्रेडिट लोन सुद्धा आपल्याला बँकेमार्फत मिळणार असल्याचे याप्रसंगी आयोजकांनी सांगितले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी उज्वला पोकळे यांनी केले .या कार्यक्रमाचे संचालन चरडे मॅडम तर आभार प्रदर्शन रेखाताई नागोलकर मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमिला बावणे ,सुलोचना मारोटकर, मालाताई वैरागडे ,नागरकर मॅडम, सरडेपे कुसुंबा काकडे सविता सोनवणे, वंदना गजबे, चित्रा गजबे, यांनी सहकार्य केले कार्यक्रमाला बचत गटाच्या महिला तसेच पीएमस्वनिधी योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## अवकाळीने विदर्भाला झोडपले

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

पूर्व विदर्भातीलनागपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा, गोंदिया जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली व सोबत वादळाचाही तडाखा बसला. काही ठिकाणी घरांची पडझड झाली, तर शेतात असलेल्या पिकांचेही नुकसान झाले.

पावसाळी वातावरणामुळे तापमानात मोठ्या फरकाने घसरण झाली असून त्रासदायक उन्हापासून दिलासा मिळाला.

वर्धा जिल्ह्यात गुरुवारी सकाळपर्यंत सर्वाधिक २६.४ मि.मी. पावसाची नोंद झाली. अनेक भागांत वादळामुळे काही घरांची पडझड झाली, टिनाची छपरे उडून गेली. काही ठिकाणी झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडले. पावसामुळे रब्बी हंगामातील गहु व इतर पिकांची हानी झाली. कारंजा तालुक्यात एक पशुधन दगावल्याचीही माहिती आहे. नागपूर शहरात सकाळपर्यंत २० मि.मी. पाऊस नोंदविला गेला. जिल्ह्यातही अनेक ठिकाणी वादळासह पाऊस बरसला. काही भागात काढणीला आलेल्या पिकांना फटका बसला.

यासह गडचिरोलीत ९.४, गोंदिया ३.४ व भंडारा येथे २ मि.मी. पावसाची नोंद झाली. तिन्ही जिल्ह्यात वादळी पावसाचा पिकांना फटका बसला. विशेषतः आंबा, मका व गव्हाचे नुकसान झाले. भंडारा जिल्ह्यात जवाहरनगर येथे एका महिलेच्या घरावर चिंचेचे झाड कोसळल्याने घराची पूर्णपणे पडझड झाली. सकाळपर्यंत मोहाडी तालुक्यातील कान्हाळगाव आणि आंधळगाव मंडळांमध्ये सर्वाधिक १६.३ मिमी पावसाची नोंद झाली. गडचिरोलीत विजांच्या कडकडाटासह आणि मेघगर्जनेसह आलेल्या अवकाळीच्या वादळाने झोडपले. गडचिरोली तालुक्यातील वीज पुरवठा सुमारे एक ते दीड तास खंडित झाला होता, ज्यामुळे नागरिकांना अंधारात राहावे लागले. गोंदिया जिल्ह्यातही अवकाळी पाऊस आणि वादळामुळे मका पीक भुईसपाट झाल्याने जवळपास ४५० हेक्टरमधील पिकाचे नुकसान झाल्याची माहिती आहे.

दुसरीकडे पश्चिम विदर्भातील अमरावती जिल्ह्यात, अमरावती, बडनेरा शहरांसह लगतच्या अंजनगाव बारी परिसरात तसेच तिवसा, अचलपूर, वरूड, चांदूर रेल्वे तालुक्यात वादळी वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटात रात्री अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे संत्रा, कांदा, भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. भाजीपाला आणि इतर पिकांसमवेत संत्राबागांची फळधारणेला फटका बसल्याचे सांगण्यात येत आहे. यवतमाळ जिल्ह्यात बाभूळगाव, दारव्हा, केळापूर, महागाव, राळेगाव, पुसद तालुक्यात रात्रीला जोरदार पावसाची नोंद झाली. या तालुक्यामध्ये १७८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. त्यामध्ये गहू, तीळ, ज्वारी, टरबूज या पिकांचा समावेश आहे. याशिवाय भाजीपाला पिकांचेही नुकसान झाले. चार जनावरे या पावसात दगावल्याची माहिती आहे. पश्चिम वऱ्हाडातील अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील काही भागात बुधवारी रात्री रिमझिम पाऊस झाला.

चंद्रपूर TODAY GOOD MORNING
BREAKING NEWS
दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, दि. 3 एप्रिल 2026

# भामरागडच्या दुर्गम भागातील समस्यांच्या सोडवणुकीसाठी भाजपची आक्रमक भूमिका

## कुवाकोडी परिसरातील आरोग्य, पाणी आणि वनहक्क पट्ट्यांचा प्रश्न ऐरणीवर

विदर्भ केसरी । भामरागड

नक्षलवाद्यांच्या दहशतीतून नुकत्याच मुक्त झालेल्या आणि छत्तीसगड सीमेला लागून असलेल्या भामरागड तालुक्यातील कुवाकोडी ग्रामपंचायत अंतर्गत गावांच्या विकासासाठी भारतीय जनता पक्षाने पुढाकार घेतला आहे. या भागातील आरोग्य, पिण्याचे पाणी, सोलर लाईट, वनहक्क पट्टे आणि मूलभूत सुविधांच्या मागणीसाठी १ एप्रिल २०२६ रोजी प्रकल्प अधिकारी अमर राऊत यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. तालुक्यातील अतिदुर्गम आणि डोंगराळ भागात वसलेल्या कुवाकोडी परिसरातील समस्या जाणून घेण्यासाठी भाजप



तालुकाध्यक्ष अर्जुन आलाम यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी सर्वप्रथम स्थानिक 'गोटूल'मध्ये ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित असलेल्या या भागाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

आरोग्य केंद्र असूनही सुविधांचा अभाव निवेदनात नमूद केल्यानुसार, कुवाकोडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर होऊन आणि इमारत उभी राहून एक वर्ष उलटले आहे. मात्र, अद्यापही हे केंद्र पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही. दुर्गम भागातील रुग्णांना उपचारासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागते. त्यामुळे हे आरोग्य केंद्र तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पाणी आणि वीज मुख्य समस्या उन्हाळ्याची चाहूल लागताच या भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो. प्रत्येक गावात किमान एक बोअरवेल असणे आवश्यक आहे.

तसेच, वीज पोहोचणे कठीण असल्याने सोलर लाईटच्या माध्यमातून गावे उजळून टाकावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वनहक्क कायद्यांतर्गत प्रलंबित असलेले पट्टे तातडीने मार्गी लावून आदिवासींना त्यांचा हक्क मिळवून देण्याची विनंतीही यावेळी करण्यात आली.

प्रशासनाचे सकारात्मक आश्वासन प्रकल्प अधिकारी अमर राऊत यांनी शिष्टमंडळाच्या सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेतल्या. या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील आणि आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष अर्जुन आलाम यांच्यासह भाजप उपाध्यक्ष दिनेश घोसरे, कुवाकोडी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. "दुर्गम भागातील जनतेला न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील," असा निर्धार अर्जुन आलाम यांनी यावेळी व्यक्त केला.

# उपकेंद्रातील ५ MVA संयंत्र बंद

विदर्भ केसरी । कुरखेडा

तालुक्यातील अंतरगाव येथील ३३/११ kV महावितरण (MSEB) उपकेंद्रातील ५ MVA क्षमतेचे मुख्य संयंत्र (Transformer) तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण परिसरात गंभीर वीज समस्या निर्माण झाली असून, याचा थेट फटका शेतकरी आणि नागरिकांना बसत आहे. या संदर्भात आरमोरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार कृष्णाजी गजबे यांनी गांभीर्याने दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे. सध्या उन्हाळी धान आणि मक्याचे पीक जोमात आहे. पिकांना पाण्याची नितांत गरज असतानाच वीज पुरवठा खंडित झाल्याने हाताशी आलेले पीक करपण्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी संतप्त नागरिकांनी माजी आमदार कृष्णाजी गजबे यांच्याकडे धाव घेतली आणि ही समस्या मांडली.



नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत कृष्णाजी गजबे यांनी तत्काळ अंतरागाव उपकेंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता मुरकुटे यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. "शेतकऱ्यांचे नुकसान सहन केले जाणार नाही. बंद पडलेले ५ MVA चे संयंत्र युद्धपातळीवर दुरुस्त करा किंवा नवीन संयंत्र बसवून वीज पुरवठा सुरळीत करा," अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या प्रसंगी पाहणी दरम्यान भाजप तालुकाध्यक्ष चांगदेव फाये, नगरसेवक व माजी नगराध्यक्ष रवींद्र गोटेफोडे, सरपंच अशोक उसेंडी, मुरकुटे सर, एपीआय महेश्करजी, लांडगे सर, सातपुते, चौधरी, बावनथडे यांच्यासह अंतरागाव परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# माझं गाव आरोग्यसंपन्न गाव" अभियानासाठी मौशिखांब ग्रामसभेत उत्स्फूर्त प्रतिसाद!

## आरोग्यदायी व स्वच्छ गाव घडविण्यासाठी ग्रामस्थांचा संकल्प

विदर्भ केसरी । मंगेश सहारे



मौशिखांब : ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या “माझं गाव आरोग्यसंपन्न गाव” अभियानांतर्गत गट ग्रामपंचायत मौशिखांब येथे विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या ग्रामसभेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच रंजिता पेंदाम होत्या. व्यासपीठावर उपसरपंच रुपाली गांधरवार, ग्रामविकास अधिकारी खुशाल नेवारे, ग्रामपंचायत सदस्य विकास उंदीरवाडे, जयकुमार खेडेकर, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष गणेश दहलकर तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. या विशेष ग्रामसभेत “माझं गाव आरोग्यसंपन्न गाव” अभियानाचे उद्दिष्ट, महत्व व त्यासाठी करावयाच्या विविध उपक्रमांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. गावातील स्वच्छता राखणे, शुद्ध पाण्याचा वापर, कुपोषण निर्मूलन, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, नियमित आरोग्य तपासणी तसेच सार्वजनिक स्वच्छतेबाबत नागरिकांनी जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले. आरोग्यदायी व स्वच्छ गाव घडविण्यासाठी प्रत्येक ग्रामस्थाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही यावेळी सांगण्यात आले. या ग्रामसभेला गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला-पुरुष, युवक तसेच बचत गटांच्या महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आरोग्यविषयक जनजागृती करून गाव निरोगी व आरोग्यसंपन्न करण्यासाठी ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तसेच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लोककलावंत मेळाव्यात लोककलावंत तथा सामाजिक कार्यकर्ता कन्नमवार यांचा सन्मान!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

सावली :- केशोरी तालुका अर्जुनी (मोर )जि. गोंदिया येथे दिनांक, 31 मार्च 2026 मंगळवार रोजी महात्मा फुले चौक, गजानन महाराज मंदिर समोर “तालुका स्तरीय झाडीपट्टी लोककलावंत मेळावा" उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन अमर विठोबा नारी शक्ती लोककला व क्रीडा बहुउद्देशीय संस्था, माहूरकुडा यांच्या वतीने करण्यात आले होते. या मेळाव्यात पारंपारिक लोककलेच्या जतन व आजगायत सुरेश कन्नमवार लोककलावंत तथा सामाजिक कार्यकर्ता चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील कोंडेखल सारख्या छोट्या गावखेड्यातील असून, ते गेल्या 10 ते वर्षांपासून व्यसनमुक्ती, दारुमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, कृषी विभागाचे विविध योजनांची माहिती, मलेरिया निर्मूलन, कुष्ठरोग, सिकलसेल, माता - बाल संगोपन, माता मृत्यू - बाल मृत्यू टाळणे, माती परीक्षण, बांबू लागवड, पोखरा, आपत्ती व्यवस्थापन, मुलगा - मुलगी भेदभाव, गर्भ लिंग निधान परीक्षण कायदयाने गुन्हा, वन विभागाचे विविध योजनांची माहीती, मानव - प्राणी संघर्ष टाळणे, वन्य जीव, संरक्षण, अनुसूचीत जाती - जमाती व नवबौद्ध समाज बांधवासाठी योजना, आदिवासींच्या विविध कल्याणकारी योजना संस्थेच्या माध्यमातून लोककलेतून महाराष्ट्रातील विविध जिल्हात व मातृ - पितृ कृपा जनकल्यान शैक्षणिक संस्था, कोटगल संस्थेमार्फतीने मागील अनेक वर्षांपासून अतिदुर्गम नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हात सुद्धा पथनाट्य - कलापथक मधून जनजागृती इत्यादी शासकीय / निमशासकीय जनजागृतीचे कार्यक्रम केलेले आहे.

कला - सांस्कृतिक संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य करणारे सन्माननीय सुरेश सुखदेव कन्नमवार रा. कोंडेखल ता.सावली जि. चंद्रपूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.संस्थेच्या वतीने त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सुरेश कन्नमवार यांनी झाडीपट्टीतील पारंपारिक लोककलेची जपवणूक करत विदर्भातील कलावंतांनी दिलेल्या संस्कारांचा वारसा पुढे चालवला आहे. त्यांनी पथनाट्य - कलापथक यांसारख्या विविध कलाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक कलाकारांना प्रेरणा मिळाली असून, समाजातील कुप्रथांविरुद्ध जनजागृती करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, मा. श्रीकांत घाटबांधे जि.प.सदस्य गोंदिया,संस्थापिका तथा नाट्य कलावंत शालिनीताई डोंगरे होत्या.यावेळी उपाध्यक्ष सुक्ली सरकार, सचिव अमर ठेंगरी,सदस्य आशिष ठेंगरी तसेच उमेश जी.बोरकर सुत्र संचालन भारतीय लोक कलाकारसांस्कृतिक संघटना साकोली तालुका अध्यक्ष यांची उपस्थिती होती.

# प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे महाविद्यालयाला यशाच्या शिखरावर पोहचवतील : कुकरेजा

विदर्भ केसरी । देसाईगंज

महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आणि कामाप्रती समर्पण वृत्तीच महाविद्यालयाच्या प्रगतीचे निर्धारण करते. प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांची कार्याप्रती समर्पण वृत्ती महाविद्यालयाच्या प्रगतीला पोषक ठरली असून, येत्या काळात प्राचार्य डॉ. गहाणे यांची कामाप्रतीची निष्ठा महाविद्यालयाला यशाच्या शिखरावर पोहोचवेल, असे गौरवोद्गार श्री मोतीलाल कुकरेजा, संस्था सचिव, नूतन शिक्षण प्रसारक मंडळ देसाईगंज यांनी काढले. ते आदर्श कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देसाईगंजच्या नवनियुक्त पूर्ण वेळ प्राचार्य डॉ. श्रीराम गोविंदा गहाणे यांच्या पदग्रहण समारंभाच्या प्रमुख अतिथी स्थानावरून बोलत होते.

नूतन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीशजी शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संस्था सचिव मोतीलालजी कुकरेजा, सहसचिव ओमप्रकाशजी अग्रवाल, सदस्य तथा माजी प्राचार्य डॉ शंकर कुकरेजा, संस्था उपाध्यक्ष श्री प्रमोदजी चिलवे, संस्था सदस्य जहीर भाई शेख, साधनाताई सपाटे, माजी प्राचार्य डॉ. पी. एच. बाळबुद्धे, श्री. जयंत सपाटे, प्राचार्य डॉ. एच. एम. कामडी, आदर्श हायस्कूल तथाकनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य दामोधर शिंगाडे, नवनियुक्त प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

यावेळी या समारंभाचे अध्यक्ष श्री जगदीश शर्मा यांनी नवनियुक्त प्राचार्य डॉक्टर श्रीराम गहाणे यांना शुभेच्छा देताना म्हणाले की, "व्यक्तीने प्रामाणिकपणे काम केले तर संस्थेची आणि व्यक्तिगत प्रगती होत असते. व्यक्तीचा कामाप्रतीचा प्रामाणिकपणा आणि कामाची निष्ठा हीच व्यक्तीची खरी ओळख असते. प्राचार्य डॉ. गहाणे हे निष्ठापूर्ण काम करणारे व्यक्तिमत्व आहेत.

त्यांच्या याच गुणामुळे त्यांनी शिक्षणक्षेत्रात नावलौकिक मिळविलेला आहे." या वेळी नवनियुक्त प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांनी व्यक्त होतांना म्हटले की, “प्राचार्य पद मिरवण्याचे नसून या पदाच्या माध्यामातून संस्था, महाविद्यालय व सर्वात महत्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सतत कार्य करण्याचे आहे. डॉ. श्रीराम गहाणे हे आदर्श महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात २६ वर्षापासून इंग्रजी विषयाचे अध्यापन करीत असून, विद्यापीठ स्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित झाले आहेत. नागपूर विद्यापीठाचा उत्कृष्ट रासेयो कार्य. अधिकारी पुरस्कार सुद्धा त्यांना प्राप्त आहे.



## एसडीपीओच्या चमूने पकडले ३ गोवंश तस्करीचे वाहन



कुरखेडा :-- कोरची मार्गावर अवैधपणे कत्तलीचा उद्देशाने गोवंशाची वाहतूक करण्यात येत आहे या गोपनीय माहिती वरून आज सकाळी ७ वाजेचा सूमारास एसडीपीओ रविन्द्र भोसले यांनी पोलीस चमू गठीत करीत सापळा रचला व कोरची मार्गावर पूराडा नजीक असलेल्या वाय पाँइंट वर कोरची कडून कूरखेडा कडे येणार्या तिन चारचाकी पिक अप वाहनाला थांबवत तपासणी केली यावेळी वाहनात निर्दयतेने १२ गोवंश कत्तलीचा उद्देशाने अवैधपणे वाहतूक करताना आढळून आल्याने तिन्ही वाहन चालकांना अटक करीत मूद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी वाहन क्र.एम. एच. ४० बि. जी. ३८६६ या वाहनात ३नग गोवंश एम एच ३३ टि ७४८४ या वाहनात ५ गोवंश तर एम एच ३४ बि झेड ६२१९ या वाहनात ४ नग गोवंश आढळून आले १२ गोवंशाची एकूण किंमत ७२ हजार व १२ लक्ष ५० हजार किमतीचे वाहन असा एकूण १३ लक्ष ७२ हजाराचा मूद्देमाल जप्त करीत आरोपी वाहन चालक राकेश वैरकार रा किन्ही ता ब्रम्हपुरी सुंदर गेडाम रा गांगलवाडी ता ब्रम्हपुरी व खूशाल दूमाने रा आरमोरी यांचा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय अधिकारी कार्यालय कूरखेडा येथील पोलीस अंमलदार नरेश अत्यालगडे, अतूल राऊत, रविंद्र घूगलोत, प्रेमाकूश आतला यांच्या चमूने केली. गो पालक बांधवनी यावेळेस उपविभागीय अधिकारी व कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार व्यक्त केले असून अशी कार्यवाही नियमीत करत रहावी अशी आशा व्यक्त केली आहे.

## विशिष्ट जाती, धर्माची मते वगळण्याचा ‘एसआयआर’च्या माध्यमातून डाव : काँग्रेसचा आरोप

मुंबई: निवडणूक आयोगाकडून राज्यात मतदार याद्यांची विशेष पुनर्रिक्षण मोहिम (एसआयआर) राबविण्यात येत आहे. या मोहिमेवर काँग्रेसकडून प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले आहे. जाणीवपूर्वक विशिष्ट जाती, धर्माची मते या पुनर्रिक्षणात वगळण्यात येत आहेत. काही राज्यांत निवडणुकीच्या तोंडावर जाणीपूर्वक या मोहिमेच्या माध्यमातून घोळ घालण्यात आल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला असून यासंदर्भात काँग्रेसच्या शिष्टमंहळाने राज्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान महाराष्ट्रात एसआयआर मोहिमेदरम्यान घाईगडबड न करता निष्पक्षपणे राबवण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या शिष्टमंडळाने आज राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांची भेट घेऊन एक निवेदन सादर केले, यावेळी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य नसीम खान, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व तेलंगणाचे सहप्रभारी सचिन सावंत, प्रदेश सरचिटणीस ॲड. संदेश कोंडविलकर व अभिजित सपकाळ आदी उपस्थित होते. महाराष्ट्रात २००२-०४ या काळात एसआयआर प्रकिया राबविण्यात आली होती, ही संपूर्ण मोहीम कोणत्याही घाईगडबडीत न करता जवळपास १३ महिन्यांच्या कालावधीत घेण्यात आली होती. आता २५ वर्षानंतर ही प्रक्रिया होत असताना साडेतीन कोटींनी वाढलेल्या मतदारसंख्येचा विचार करून या प्रक्रियेचे नियोजन करावे. महाराष्ट्रात पुढील २-३ वर्षांत कोणत्याही निवडणुका नसल्याने ही प्रक्रिया दीड-दोन वर्ष चालली तरी आक्षेप घेण्याचे कारण नाही. पुरेसा वेळ देऊन ही प्रक्रिया पार पाडल्यास जनतेच्या मनात संशयाची भावना राहणार नाही. जनगणना आणि एस.आय.आर. एकाच अधिकारी वा कर्मचाऱ्याकडून करू नये. ओसीआर किंवा मशीन रिडेबल स्वरूपात तसेच कागदी प्रती देण्यात याव्यात. एस.आय.आर.वर आक्षेप नोंदविण्यासाठी तसेच नोटिशीला उत्तर देण्यासाठी किमान एक महिन्याची मुदत देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# आदिवासींच्या 'मरणयात्रे'विरुद्ध एल्गार..!

## भटपारच्या रस्त्यासाठी १३ एप्रिलपासून भामरागड तहसीलवर धरणे आंदोलन

विदर्भ केसरी । भामरागड

- स्वातंत्र्याचा अमृतकाळ साजरा होत असतांनाच, दुसरीकडे गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील भटपार येथील जनता आजही चिखलातून मरणयात्रा काढत आहे. वारंवार मागणी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने आता भारतीय कम्युनिस्ट पार्टी (भाकप) आणि भटपार ग्रामस्थांनी थेट प्रशासनाविरुद्ध शड्डू ठोकला आहे. भटपार ते दर्भा आणि भटपार ते घोटपाडी या रस्त्यांच्या मागणीसाठी दिनांक १३ एप्रिल २०२६ पासून भामरागड तहसील कार्यालयासमोर बेमुद्दत लक्षवेधी धरणे आंदोलन पुकारण्यात आले आहे. प्रशासकीय अनास्थेचा फटका भटपार परिसरात रस्ता नसल्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांचे हाल होत आहेत. रस्ता नसल्याने गावात 'लाल परी'



(एसटी बस) येत नाही. याचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थ्यांना बसत असून त्यांना शिक्षणासाठी दररोज पायपीट करावी लागत आहे. आरोग्य सुविधेचा तर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे; पावसाळ्यात एखादा रुग्ण किंवा गरोदर माता गंभीर असल्यास त्यांना खाटेवर टाकून चिखलातून न्यावे लागते. अनेकदा वेळेवर उपचार न मिळाल्याने जीव गमावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कॉर्पोरेटला रेड कार्पेट, जनतेला चिखल! "मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्या आणि उद्योगपतींच्या फायद्यासाठी प्रशासन रातोरात रस्ते चकाचक करते, मग दुर्गम भागातील कष्टकरी आदिवासींच्या रस्त्यासाठी निधी का मिळत नाही?" असा रोखठोक सवाल भाकपचे जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार आणि जिल्हा सदस्य कॉ. सुरज जककुलवार यांनी उपस्थित केला आहे. भांडवलदारी धोरण सोडून सरकारने सामान्य जनतेच्या मूलभूत हक्कांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

आंदोलकांच्या प्रमुख मागण्या:

भटपार ते दर्भा: या मार्गाचे पक्के डांबरीकरण तात्काळ मंजूर करून काम सुरू करावे.

भटपार ते घोटपाडी: पावसाळ्यापूर्वी या मार्गावर तातडीने माती-मुरूम रस्ता तयार करावा.

एसटी बस सेवा: रस्ता दुरुस्त करून भटपार परिसरात नियमित बस सेवा सुरू करावी.

जोपर्यंत मंजुरी नाही, तोपर्यंत माघार नाही! भटपार ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, जोपर्यंत रस्त्याच्या कामाला लेखी मंजुरी मिळत नाही, तोपर्यंत तहसील कार्यालयासमोरून हलणार नाही, असा इशारा दिला आहे. या आंदोलनामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, आता शासन यावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २८ मेरिट विद्यार्थी आमचे २८ अलंकार : अशोक भैया

विदर्भ केसरी । ब्रह्मपुरी

सत्र २४-२५ मधिल गोंडवाना विद्यापीठीय परीक्षेत आपल्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील २८ विद्यार्थ्यांनी मेरिट यादित येऊन महाविद्यालयाचा मान उंचावला.हे विद्यार्थी जीवनात खूप मोठे होतील.हे २८ विद्यार्थी आपल्या महाविद्यालयाचे २८ अलंकार आहेत,असे मार्मिक भाष्य नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैयांनी केले.ते येथील पदवीदान समारंभात बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम,प्रा विनोद नरड, डॉ राजू आदे उपस्थित होते.यावेळी



मेरिट विद्यार्थ्यांना पदवीदान करुन त्यांचा गौरव करण्यात आला. यावर डॉ खानोरकर व प्राचार्य डॉ शेकोकरांनी भाष्य केले.प्रास्ताविक आयोजक डॉ.आदे,संचालन डॉ प्रकाश वट्टी तर आभार प्रा निलिमा रंगारींनी मानले.कार्यक्रमाला समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

गडचिरोली TODAY GOOD MORNING
BREKING NEWS
दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, दि. 3 एप्रिल 2026


Selected

## शासकीय कंत्राटदरांचा ७ एप्रिल पासून बेमुदत 'काम बंद' चा इशारा



मुंबई: जिल्हा पातळीवर केलेल्या शासकीय कामांची देयके गेली १६ महिने मिळत नसल्याने राज्यातील शासकीय कंत्राटदारांनी ७ एप्रिल पासून 'बेमुदत काम बंद' आंदोलन पुकारण्याचा इशारा दिला. याचा फटका मान्सूनपूर्वे कामांना बसणार आहे. जलसंपदा, नगरविकास, पर्यटन, ग्रामविकास, जलजीवन विभागाच्या कामांची ९६ हजार ५०० कोटी रुपये थकबाकी आहे. राज्यातील तीन लाख छोटे मोठे कंत्राटदार ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद पातळीवर शासकीय नागरी कामे करतात. सार्वजनिक बांधकाम, जलजीवन मिशन, ग्रामविकास,पर्यटन, नगरविकास, जलसंपदा, जिल्हा नियोजन विभागाअंर्तगत काढण्यात येणारी कामांचा समावेश असतो. लाडकी बहीण योजने नंतर राज्याची आर्थिक स्थिती खालावली आहे. त्याचा फटका या कंत्राटदारांच्या देयकांना बसला आहे. कंत्राटदारांची गेल्या वर्षी १ लाख १६ हजार कोटी रुपये थकीत होते. कंत्राटदारांनी केलेल्या आंदोलनामुळे सरकारने २० हजार कोटी रुपये अदा केले आहेत. एक लाख रुपये दयेक थकबाकी असलेल्या कंत्राटदाराला पाच सहा हजार रुपये देऊन कंत्राटदारांच्या जखमांवर मीठ चोळण्यात आले. कंत्राटदारांनी थकीत दयेके द्यावीत म्हणून मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतली. तीन कंत्राटदारांनी या आर्थिक समस्याला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप कंत्राटदारांच्या महासंघाने केला आहे. शेतकऱ्यांप्रमाणे कंत्राटदारही आत्महत्याच्या निर्णयापर्यंत आले असल्याचे संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले.कंत्राटदारांची दयेके दिली जातील असे, आश्वासन अनेक वेळा दिले गेले आहे पण ते सरकार पूर्ण करु शकले नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशनात जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, नाना पटोले या विरोधकांनी कंत्राटदारांच्या दयेकाचा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला होता. लाडक्या बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवरील ताण वाढला आहे. त्याचा परिणाम स्थानिक पातळीवर होणाऱ्या नागरी कामांची दयेकांवर झाला आहे. सध्या मान्सून पूर्वे कामे स्थानिक पातळीवर सुरु आहेत. कंत्राटदारांनी सात एप्रिल पासून राज्यातील शासकीय कामे बंद करण्याचा इशारा दिला आहे. प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वी काम बंद आंदोलन करण्यात आले होते.

# भाजप - काँग्रेस शेतकऱ्यांच्या मुळावर उठले

## डाव्या लोकशाही पक्षांची टीका ; शेतकरी बांधवांनो काळ कठीण आलेला आहे

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

गडचिरोली :- जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी स्टील प्लांटसाठी भूसंपादन होत आहे. विशेषतः भेंडाळा, जैरामपूर, अडपल्ली, येवली शिवणी परिसरात शेतकरी तीव्र आंदोलनाच्या भूमिकेत आहेत. मात्र पण जिल्ह्यात मुळात लोह प्रक्रिया कारखाने होण्यापासून आणि त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादन होण्यापासून थांबवणे कठीण झाले आहे. याला सत्ताधारी भाजप एवढाच काँग्रेससुध्दा जबाबदार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सापनाथ आणि नागनाथांच्या बनावटबाजीला बळी पडून आपल्या शेतजमिनी घालवू नये असे आवाहन डाव्या लोकशाही आघाडीच्या वतीने शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. स्थानिक सर्कीट हाऊस येथे आयोजित पत्रकार परिषदेत डाव्या आघाडीच्या नेत्यांनी सांगितले की, रोजगाराच्या नावाखाली भाजप - कॉग्रेसच्या लोकांनी हा जिल्हा कधीचाच भांडवलदारांच्या हवाली केलेला आहे. शेतकऱ्यांनी लक्षात घ्यावे की या जिल्ह्यात जंगल- पहाडात लोह खाणी सुरू होत आहेत, म्हणून लोह प्रक्रिया कारखाने सुरू होत आहेत. कारखाने होणार तर आपल्या शेतजमिनी बळजबरीने बळकावल्या जाणारच सध्या सुरजागड येथे एकच लोहखाण सुरू आहे. वेलमागड - बुर्गी, झेंडेपार - आगरी- मसेली या ११ लोहखाणींची मंजुरी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तर दमकोंडवाही, पुसेर - मुतनूर सह ४० पेक्षा अधिक ठिकाणी लोह खाणींची चाचपणी सुरू आहे. या खाणींमधून निघणाऱ्या लोह दगडावर प्रक्रिया करण्यासाठी हेडरी, कोनसरी, वडलापेठा येथे स्टील प्लांट उभारण्याचे काम सुरू आहे. मुधोली- जैरामपूर, भेंडाळा येथे भूसंपादनाची कार्यवाही प्रशासनाने सुरू केली आहे. जिंदाल, वरद फेरो अलॉय सह जवळपास ४० स्टील प्लांट मंजूरीच्या प्रक्रियेत आहेत. तर ५० पेक्षा जास्त स्टील कंपन्या स्टील प्लांट उभारण्यांनी प्राथमिक चाचपणी सुरू केली आहे. अहेरी विभागात काही प्रमुख सिमेंट कंपन्यांनीही खाण आणि कारखान्यांसाठी तयारी सुरू केलेली आहे.

एकुणच गडचिरोली जिल्ह्यात लहान मोठे शंभरेक स्टील आणि



सिमेंट प्लांट येणाऱ्या ५-६ वर्षात उभारले जाणार आहेत. यासाठी किमान १ लाख २० एकर शेतकऱ्यांची खासगी शेतजमीन भूसंपादीत होणे क्रमप्राप्त आहे. तर होवू घातलेला विमानतळ, रेल्वे, समृद्धी महामार्ग, मायनिंग कॉरीडोर मार्ग अशा विविध बाबींसाठी किमान २५-३० हजार एकर शेतजमीन भूसंपादीत होणे निश्चित आहे. तर विविध खाणींपोटी दिड लाख लाख एकरहून अधिक जंगल क्षेत्र उध्वस्त केला जाणार आहे. प्रक्रिया कारखान्यांसाठी जिल्ह्यातील एकूण शेतजमिनी पैकी ६५ ते ७० % शेतजमिनी येणाऱ्या दिवसांत भूसंपादीत होणे टाळता येण्यासारखे नाही. शेतकऱ्यांच्या शेतजमीनी वाचवायच्या असतील तर शेतकऱ्यांनी आधी भांडवलदारांचा पाठिराखा भाजप आणि संधीसाधू काँग्रेसचा त्याग केला पाहिजे, कारण याच लोकांनी या जिल्ह्यात रोजगाराच्या नावाखाली खाणी मंजूर केल्या, ठोस विरोधाची भूमिका न घेता खाण कंपन्यांचे समर्थन केले. ज्यामुळे आता शेतकऱ्यांच्या शेत जमिनीमध्ये बळजबरीने भूसंपादन करुन स्टील प्लांट लागणार आहेत. आमचे डावे पक्ष आणि स्थानिक ग्रामसभा जेव्हा जेव्हा गडचिरोली जिल्ह्यात लोह खाणी नकोत म्हणून लढत आले, तेव्हा तेव्हा भाजप उघडपणे तर कॉग्रेस आडमार्गाने खाणींच्या समर्थनात राहिले आहेत. आता जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांच्या जमिनींच्या भूसंपादनाचा प्रश्न उभा राहतो तेव्हा तेव्हा हेच भाजप काँग्रेसचे लोकं शेतकऱ्यांचे तारणहार आहोत हे दाखवण्यासाठी पुढे येतात.

मात्र कोणसरी असो की जैरामपूर मुधोली शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करण्यासाठी आणि जनसुनावणीत माणसं आणण्यासाठी पुढाकार घेणारे कोण आहेत हे सर्वांनी लक्षात घेण्यासारखे आहे. २०२२ साली एट्टापल्लीच्या नाक्यावर हजारो आदिवासी नागरिकांनी ठिय्या आंदोलन केले, त्यावेळी कॉंग्रेसचा एक मोठा नेता या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी येणार होता, पण त्या नेत्याला २०० ट्रकांचा ट्रान्सपोर्टचा ठेका भेटताच त्याने आंदोलनाकडे पाठ दाखवली परिणामी आज सुरजागडची लोहखाण सुरू राहिली आहे. आणि आता मलाईच्या हिस्सेवाटणी वरुन भाजप- काँग्रेस एकमेकांवर टिकाटिप्पणी करत आहेत. त्यांना शेतकऱ्यांच्या हितापेक्षा चमकोगिरीच्या आडून स्वतःचे आर्थिक हित साधायचे असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली. जिल्ह्यातील इतर परिसरातील कोणालाही आपल्या शेतजमिनी वाचवायच्या असतील तर आपल्यावरच्या अन्यायाचा मुळ असलेल्या प्रस्तावित लोह खाणी आणि जिल्हा उध्वस्त करु पाहणाऱ्या गडचिरोली जिल्हा खनिज विकास प्राधिकरणा विरोधात सर्वांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. त्यासाठी खाण समर्थक भाजप काँग्रेसचा त्याग करून जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी खाण विरोधी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन डाव्या लोकशाही पक्षांच्या वतीने करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव मंडळाचे सदस्य कॉ. डॉ. महेश कोपूलवार, शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई रामदास जराते, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. अमोल मारकवार, आझाद समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष राज बन्सोड, जिल्हा सचिव कॉ. देवराव चवळे, आसपा प्रदेश सचिव धर्मानंद मेश्राम, भाई शामसुंदर उराडे, जयश्री वेळदा, ॲड. जगदीश मेश्राम, कॉ. सचिन मोतकुरवार, कॉ. सुरज जक्कुलवार, कविता ठाकरे, कविता मेश्राम, चंद्रकांत भोयर, डॉ. धर्मराज सोरदे, प्रमोद कोसेकर, रमेश मेश्राम, विवेक खोब्रागडे, नागसेन खोब्रागडे, सुरेंद्र वासनिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## हनुमान जन्मोत्सवात चामोर्शी भक्तिमय!

**विदर्भ केसरी । चामोर्शी**

शहरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त आज भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे अनोखे चित्र पाहायला मिळाले. सकाळपासूनच शहरातील विविध हनुमान मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी उसळली होती. जय श्रीराम आणि जय हनुमान च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या पावन प्रसंगी भाजपा आदिवासी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी चामोर्शीतील विविध हनुमान मंदिरांना भेट देत विधीवत पूजा-अर्चना केली. त्यांनी हनुमंताच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील व देशातील सर्व नागरिकांच्या सुख-शांतीसाठी, समृद्धीसाठी आणि सुदृढ आरोग्यासाठी प्रार्थना केली. त्यांच्या उपस्थितीमुळे भाविकांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला होता. मंदिर परिसर फुलांनी सजविण्यात आला होता, तसेच भजन-



कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे वातावरण अधिकच भक्तिमय झाले होते. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत आरत्या केल्या, तर तरुणांनी उत्साहाने स्वयंसेवक म्हणून सेवा बजावत होते. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला.

यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. शेकडो भाविकांनी शांततेत व भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रसाद वितरणाच्या वेळी सर्वत्र आनंद, समाधान आणि एकात्मतेचे वातावरण अनुभवायला मिळाले. माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत धार्मिक सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असल्याचे सांगितले. त्यांनी सर्वांना सामाजिक सलोखा जपण्याचे आणि एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी भाजपा आदिवासी मोर्चा प्रदेशाध्यक्ष डॉ. देवराव होळी यांच्या सोबत दिलीप चलाख, हिराजी बनपूरकर, अनिल प्रिसिंगलवार, जयराम चलाख, हनुमान जन्मोत्सवाच्या या पावन निमित्ताने चामोर्शी शहरात श्रद्धा, भक्ती आणि एकजुटीचा सुंदर संगम पाहायला मिळाला. हा सोहळा नागरिकांच्या मनात भक्तीची उर्जा आणि सकारात्मकता निर्माण करून गेला.

## राज्यपाल विष्णु देव वर्मा यांची डॉ. अशोकजी नेते यांच्यासोबत सदिच्छा भेट

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल माननीय विष्णु देव वर्मा यांची दिल्ली येथे गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा पार पडली. गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल, दुर्गम तसेच नक्षलग्रस्त आणि विकासाच्या दृष्टीने मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल, याबाबत सकारात्मक आणि दूरदृष्टीने विचारविनिमय करण्यात आला. यासोबतच




महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी व औद्योगिक विकासात ठेवलेले स्वप्न साकार करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असून, त्या दृष्टीने राज्यपालांनीही विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे चर्चेत अधोरेखित करण्यात आले.

या चर्चेत पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती तसेच नक्षलप्रभावित भागातील विकासकामांना गती देण्याबाबत विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला. विशेषतः यापूर्वी माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी भामरागड तालुका दत्तक घेत विकासासाठी पुढाकार घेतला होता, त्याच धर्तीवर गडचिरोली जिल्ह्यातील एखादा तालुका दत्तक घ्यावा तसेच जिल्ह्याचा प्रत्यक्ष दौरा करावा, अशी विनंती डॉ. नेते यांनी राज्यपालांना केली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्यपाल महोदयांनी लवकरच गडचिरोली दौऱ्यावर येण्याचे आश्वासन दिले.

## मनरेगा योजनेतील विहिरींचे थकीत देयके तात्काळ अदा करा : खासदार डॉ. किरसान

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

देसाईगंज - मनरेगा योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या विहिरी तसेच इतर कामांचे देयके शासनाकडे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असून ती तात्काळ अदा करण्यात यावीत, अशी मागणी गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी लोकसभेत 'शून्य प्रहर' (Zero Hour) दरम्यान केली. गडचिरोली-चिमूर हा मतदारसंघ भौगोलिक व आर्थिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक असून, येथील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत मनरेगा अंतर्गत विहीर बांधकाम योजना ही शेतकऱ्यांसाठी




जीवनवाहिनी ठरत आहे. मात्र या योजनेसाठी मंजूर झालेला निधी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेकडो विहिरींची कामे अर्धवट अवस्थेत पडून आहेत.गरीब मजुरांना त्यांच्या हक्काचे मानधन अनेक महिन्यांपासून मिळालेले नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. ही केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून गरीब जनतेच्या जीवनावर गंभीर परिणाम करणारी बाब असल्याचे खासदार किरसान यांनी स्पष्ट केले.त्यांनी केंद्र सरकारकडे रखडलेला निधी तातडीने जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून देण्याची, मजुरांचे थकीत वेतन कोणताही विलंब न लावता थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची तसेच अर्धवट राहिलेल्या विहिरींची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी विशेष आर्थिक तरतूद करण्याची मागणी केली.

## जिवतीतील कष्टकरी शेतकऱ्यांच्या जमिनीसाठी खासदार प्रतिभा धानोरकरांचा संसदेत लढा

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

चंद्रपूर :- दशकांपासून जमिनीवर घाम गाळणाऱ्या कष्टकऱ्याला नियमांच्या साखळदंडात किती काळ अडकवून ठेवणार असा संतप्त सवाल करत, खासदार प्रतिभा धानोरकर यांनी लोकसभेत जिवती तालुक्यातील वनजमीन धारक शेतकऱ्यांचा आवाज बुलंद केला. जिवतीमधील आदिवासी आणि बिगर-आदिवासी शेतकरी पिढ्यानपिढ्या ज्या जमिनी कसत आहेत, त्यांचा मालकी हक्क नाकारणाऱ्या जाचक अटी तातडीने रद्द करून त्यांना जमिनीचे पट्टे देण्याची आग्रही मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. लोकसभेत बोलतांना खासदार प्रतिभा धानोरकर यांनी वनहक्क कायद्यांतर्गत असलेल्या 'तीन पिढ्यांच्या पुराव्याच्या' अटीवर टीका केली. त्या म्हणाल्या की, "जिवती तालुक्यातील शेतकरी वर्षानुवर्षे या जमिनीवर घाम गाळत आहेत, मात्र जमिनीचे पट्टे मिळवण्यासाठी ७५ वर्षांचे किंवा तीन पिढ्यांचे पुरावे मागणे ही अट अत्यंत जाचक आहे. अनेक गरीब शेतकऱ्यांकडे एवढे जुने कागदपत्रे उपलब्ध नसल्याने त्यांचे दावे फेटाळले जात आहेत, हा त्यांच्यावर




मोठा अन्याय आहे." खासदार प्रतिभा धानोरकर यांनी ही ७५ वर्षांची अट रद्द करून, जे शेतकरी प्रत्यक्ष जमिनीचा ताबा ठेवून ती कसत आहेत, त्यांच्याच नावे जमिनीचे पट्टे करण्यात यावेत अशी मागणी केली.

वनविभागाच्या जाचक नियमांमुळे शेतकरी हक्काच्या जमिनीपासून दूर राहत असून, त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे या कायद्यात तातडीने सुधारणा करून शेतकऱ्यांना मालकी हक्क बहाल करावा, अशी मागणी त्यांनी संसदेत केली. "शेतकरी हा देशाचा कणा आहे, परंतु नियमांच्या जाळ्यात अडकल्यामुळे त्यांना त्यांच्याच घामाच्या जमिनीचा मालकी हक्क मिळत नाही, ही खेदाची बाब आहे. जोपर्यंत या जिवतीमधील शेतकऱ्यांच्या कष्टाला पूर्ण न्याय मिळत नाही आणि त्यांना जमिनीचे पट्टे हाती मिळत नाहीत, तोपर्यंत माझा हा लढा संसदेत आणि बाहेरही असाच सुरू राहील," असा ठाम निर्धार खासदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केला. या मागणीमुळे संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यातील वनजमीन धारक शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## राज्याला जीएसटीतून २,५१,२५६ कोटींचा महसूल

### राज्याचा वस्तू व सेवाकर महसूल १२.६ टक्क्यांनी वाढला

**विदर्भ केसरी । मुंबई**

वित्तीय वर्ष २०२५-२६ दरम्यान महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवाकर विभागाने उल्लेखनीय महसूल कामगिरी नोंदवली आहे. वस्तू व सेवा कर (जीएसटी), मूल्यवर्धित कर (व्हॅट) आणि व्यवसाय कर (पीटी) यांमधून एकूण २,५१,२५६ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला असून, मागील वर्षाच्या २,२३,०८७ कोटी रुपयांच्या तुलनेत १२.६ टक्के वाढ झाली आहे. राज्यांमधील वस्तू व सेवाकर महसूल संकलनात महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले आहे. दुसऱ्या क्रमांकाच्या राज्याच्या तुलनेत येथील महसूल दुपटीपेक्षा अधिक आहे. राज्यातील जीएसटी महसूल वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत १४.६ टक्क्यांनी वाढून १,८६,९९१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. राज्याच्या मजबूत अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब म्हणून जीएसटी महसुलातील ही वाढ देशातील उच्च वाढ दरांपैकी एक असून, ती राष्ट्रीय सरासरीपेक्षा जवळपास दुप्पट आहे. वस्तू व सेवा कर, मूल्यवर्धित कर आणि व्यवसाय कर या करांचा वाटा



राज्याच्या महसुलात सुमारे ६४ टक्के आहे. विभागाने सलग चौथ्या वर्षी आपला अर्थसंकल्पीय अंदाज ओलांडत १००.२ टक्के लक्ष्य साध्य केले आहे. जीएसटी दर संयुक्तिकरणामुळे निर्माण झालेल्या काही अडचणींनंतरही विभागाने सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सुधारित अनुपालनाच्या जोरावर या आव्हानांवर मात करीत १४.६ टक्क्यांची भक्कम वाढ नोंदवली आहे.महाराष्ट्र राज्य जीएसटी विभागाने डेटा-आधारित अभिप्राय यंत्रणा, प्रगत विश्लेषणावर आधारित अंमलबजावणी, उच्च जोखमीच्या करदात्यांवर अधिक लक्ष, तसेच प्रामाणिक करदात्यांसोबत सातत्यपूर्ण संवाद यांसारख्या विविध सुधारणा उपाययोजना राबवल्या आहेत. यासोबतच, व्यवसाय सुलभतेच्या (ईज ऑफ डुईंग बिझनेस) सुधारणांवरही विभागाचा सातत्याने भर असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली.

## एचपीव्ही वॅक्सिंग बद्दल श्रीराम विद्यालयात पालक सभेतून माहिती

**विदर्भ केसरी । कुरखेडा**

आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीराम विद्यालय कुरखेडा येथे पालक सभेच्या माध्यमातून ९ ते १४ वयोगटातील विद्यार्थिनींना दिला जाणाऱ्या एच पी व्ही वॅक्सिंग संदर्भात शासन परिपत्रकाच्या अंमलबजावणी नुसार नुकताच श्रीराम विद्यालय कुरखेडा येथे वैद्यकीय अधिकारी डॉ.रामेश्वरी आत्राम पी. एस. सी. देऊळगाव यांनी पालकांना एसपीव्ही वॅक्सिंग संदर्भात माहिती देऊन पालकांच्या मनातील संभ्रम दूर केला आहे ते वॅक्सिंग संदर्भात बोलताना म्हटले की, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासह मानवी पॅपिलोमाव्हायरसमुळे होणाऱ्या विविध कर्करोगांपासून संरक्षण करणारी अत्यंत सुरक्षित व प्रभावी लस आहे]. ही लस प्रामुख्याने ९ ते १४ वयोगटातील मुलींना दिली जाते, जी गर्भाशयाचे मुख, गुदद्वार आणि घशाच्या कॅन्सरला ९०% पेक्षा जास्त प्रतिबंध करू शकते त्यामुळे एचपीव्ही वॅक्सिनबद्दल महत्त्वाची माहिती: या वॅक्सिंगचा मुख्य उद्देश: गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग रोखणे, जो महिलांमधील कर्करोगाचा एक प्रमुख प्रकार आहे या ही वॅक्सिंग कोणाला देता येते तर ९-१४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी ही सर्वोत्तम मानली जाते. यावेळी प्राचार्य नागेश्वर फाये, स्वास्थ सहाय्यक दिलीप तिजारे व महिला स्वास्थ पर्यवेक्षक करिश्मा राऊत यांनी सुद्धा पालकांना मार्गदर्शन केले. यावेळी राजेंद्र पंधरे, वासुदेव मस्के, प्रा. प्रदीप पाटणकर, प्रा. विनोद नागपूरकर, संजय शिरपूरवार, अश्विनी फाये, शिक्षिका लता राऊत, पालक विशूभाऊ ठलाल, शारदा ऊइके, धनराज लोहमबरे सह मोठ्या संख्येत पालक उपस्थित होते.